रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३०५
www.ramprahar.com

बुधवार, २४ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग


काँग्रेसने देशाची माफी मागावी -भाजप प्रदेशाध्यक्ष/२

सुक्या मासळींचे दर वाढले; मागणीमुळे तुटवडा/५

खेलो इंडिया कबड्डी स्पर्धेसाठी पंच प्रदीप मोकल यांची निवड/८


## पंतप्रधान मोदींचे ऑस्ट्रेलियात जोरदार स्वागत

**सिडनी** : जी-७ परिषदेत आपली छाप पाडल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर



गेले आहेत. सिडनीत भारतीय पंतप्रधान मोदींचे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथोनी अल्बनीस यांच्याकडून जंगी स्वागत करण्यात आले. येथे जमलेल्या हजारो अनिवासी भारतीय आणि ऑस्ट्रेलियन नागरिकांशी पंतप्रधान मोदींनी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, क्रिकेटने आपल्याला (भारत आणि ऑस्ट्रेलिया) अनेक वर्षांपासून बांधून ठेवले आहे. त्याचबरोबर आता टेनिस आणि चित्रपटही आपल्याला जोडून ठेवत आहेत. आपले खाद्यपदार्थ आणि खाण्यापिण्याच्या सवयी वेगळ्या असू शकतात, पण आता आपल्याला मास्टर शेफने जोडले आहे. या वेळी ऑस्ट्रेलियातील भारतीय वंशाचे लोक पंतप्रधान मोदींच्या स्वागतासाठी हजारोंच्या संख्येने जमले होते.

# सेझबाधित शेतकऱ्यांच्या जमिनी परत करा

### भाजप नेत्यांची महसूलमंत्र्यांकडे मागणी; सकारात्मक प्रतिसाद



**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर मुदतीनंतरही प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात, अशी मागणी भाजप आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली. या मागणीस मंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

रायगडातील पेण, पनवेल व उरणमध्ये सेझ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत चर्चा करण्याकरिता महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या मंत्रालयीन दालनात मंगळवारी (दि. २३) बैठक आयोजित करण्यात आली होती.

या वेळी भाजप आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार धैर्यशील पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांकडून सेझ प्रकल्पासाठी घेण्यात आलेली सुमारे साडेतीन हजार एकर जमीन १५ वर्षांनंतर तशीच पडून आहे. मुदतीनंतरही या जमिनीवर प्रकल्पाची उभारणी करण्यात आली नसल्याने संपादित केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत कराव्यात.

यावर महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत हव्यात या भावनेशी आम्ही सहमत आहोत. त्यांना त्यांच्या जमिनी देण्याचीसुद्धा आमची इच्छा आहे. त्यासाठी जी काही योग्य कार्यवाही करावी लागेल ती केली जाईल, असे आश्वासित केले.

या बैठकीस आमदार जयंत पाटील, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे आणि शेतकरी उपस्थित होते.

### एक्स्प्रेस वेवर पुन्हा विचित्र अपघात

## कंटेनरची सहा वाहनांना धडक; एक ठार, पाच जण जखमी





**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील खोपोली बायपासजवळ ढेकू गावाच्या हद्दीत एका ब्रेक फेल झालेल्या कंटेनरने पुढे जाणाऱ्या सहा कारना धडक दिल्याची घटना सोमवारी (दि. २२) रात्री घडली. या अपघातात एकाचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाले आहेत.

पुणे येथून मुंबईमार्गे राजस्थानकडे जाणाऱ्या एका कंटेनर (आरजे १९-जीएच ४४९७)चा सोमवारी रात्री ११च्या सुमारास एक्स्प्रेस वेवर ढेकू येथील तीव्र उतारावर ब्रेक फेल झाला. या अनियंत्रित कंटेनरची इको कार (एमएच ०३-डीए ८२३३) क्रेटा कार (एमएच ४३-बीएन ९११), टाटा जेस्ट कार (एमएच १४-ईयू ३५२१), हुंडाई कार (एमएच ४७-के ६११) किया कार (एमएच ०३-ईबी ९७७७) आणि स्विफ्ट कार (एमएच ०२-बीएच ९०२२) यांना धडक बसली.

या अपघातात अनेक प्रवाशांना गंभीर दुखापती झाल्या. यातील सुभाष पंढरीनाथ चौगुले (वय ४५, रा. वाशी) यांचा रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला, तर चंद्रकला सुभाष चौगुले (४३, वाशी), अमित कुमार हरिराम तठेर (३०, भांडूप), कौसर अलि शाह (४०, भांडूप), आफताब समीउल्ला आलम (१९, भांडूप), अफसर अली मोहम्मद (३६, वडाळा, मुंबई) जखमी झाले आहेत.

अपघात घडताच आयआरबी यंत्रणा, महामार्ग व स्थानिक पोलीस यंत्रणा, अपघातग्रस्त मदत टीम घटनास्थळी दाखल होत जखमींना रुग्णालयात रवाना करण्यात आले, तसेच अपघातातील वाहने युद्धपातळीवर बाजूला करण्यात आली.

अपघातानंतर कंटेनरचालक पळून गेला, तर क्लिनरला महामार्ग वाहतूक पोलीस उपनिरीक्षक योगेश भोसले व टीमने त्याचा पाठलाग करून कंटेनरसह खोपोली पोलीस ठाण्यात आणले. या घटनेबाबत खोपोली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## युपीएससी परीक्षेत मुलींचा डंका

### देशात इशिता किशोर, तर राज्यात कश्मिरा संखे प्रथम

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) नागरी सेवा २०२२ परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. या निकालात पहिल्या तीन स्थानावर मुलींनी स्थान पटकावत बाजी मारली आहे. इशिता किशोर हिने या परीक्षेत देशामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला असून ठाण्यात राहाणारी कश्मिरा संख्ये राज्यात पहिली आहे.

भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा, केंद्रीय सेवा गट अ, गट ब अशा पदांसाठी युपीएससी आयोगाने नागरी सेवा परीक्षा घेतली होती.



२४ एप्रिल ते १८ मे २०२३ या कालावधीत ५८२ उमेदवारांची तिसऱ्या टप्प्यातील वैयक्तिक मुलाखत घेण्यात आली होती. यूपीएससीने जाहीर केलेल्या निकालात पहिल्या दहा क्रमांकामध्ये सहा मुली, तर चार मुले आहेत. त्यात इशिता किशोर, गरिमा लोहिया, उमा हरती एन, स्मृती मिश्रा, मयूर हजारिका, गहना नव्या जेम्स, वसीम अहमद भट, अनिरुद्ध यादव, कनिका गोयल, राहुल श्रीवास्तव यांचा समावेश आहे.

अंतिम परीक्षेत एकूण ९३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात ३४५ विद्यार्थी खुला गट, ९९ ईडब्ल्यूएस, २६३ ओबीसी, १५४ एसी, ७२ विद्यार्थी एसटी वर्गातील आहेत. १७८ विद्यार्थ्यांची आरक्षित सूची तयार करण्यात आली आहे, तर आयएएस पदासाठी १८० विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात आली आहे.

### एक राज्य एक गणवेश योजना लागू होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

एक राज्य एक गणवेश या योजनेनुसार यंदापासून राज्यातील प्रत्येक सरकारी शाळेतील विद्यार्थी एकाच गणवेशात दिसतील, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली आहे.

दरम्यान, काही शाळांनी या निर्णयापूर्वीच कपड्यांच्या ऑर्डर दिल्याने हे विद्यार्थी तीन दिवस सरकारी योजनेचा आणि तीन दिवस शाळेने निर्धारित केलेला गणवेश वापरतील, असेही मंत्री केसरकर यांनी स्पष्ट केले.

## दोन अपघातांमध्ये १४ ठार, २० जण जखमी

**बुलडाणा, अमरावती** : राज्यात दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये १३ जण दगावले आहेत. बुलढाण्यातील सिंदखेडराजाजवळ जुन्या महामार्गावर झालेल्या अपघातात नऊ जण ठार झाले, तर अमरावतीमध्ये झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील पाच जण मृत्युमुखी पडले. बुलढाणा जिल्ह्यातील मुंबई-नागपूर जुन्या महामार्गावर सिंदखेडराजाजवळ एसटी बस आणि कंटेनरचा अपघात झाला. यात नऊ जणांचा मृत्यू, तर १३ प्रवासी जखमी झाले. अमरावतीमधील बाबळी येथून लग्नसमारंभावरून दर्यापूरकडे परतणाऱ्यांच्या वाहनाला सोमवारी रात्री ११च्या सुमारास दर्यापूर-अंजनगाव मार्गावर लेहगावजवळ आयशर वाहनाने पाठीमागून धडक दिली. यात पाच जणांचा मृत्यू, तर सात जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलेय.


## निवडक

### मुंबईत स्फोट घडवण्याची सोशल मीडियावरून धमकी

**मुंबई** : महाराष्ट्रात बॉम्बस्फोटाच्या धमकीची काही प्रकरणे सातत्याने समोर येत आहेत. आता मुंबई पोलिसांच्या ट्विटर हँडलला टॅग करीत धमकी देण्यात आली आहे. पोस्टमध्ये धमकी देणाऱ्याने मी लवकरच मुंबईत स्फोट घडवणार आहे, असे म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी रुग्णालयात दाखल

**मुंबई** : माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी



यांची प्रकृती बिघडली असून सोमवारी उशिरा त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जोशी हे बाळासाहेब ठाकरे यांच्या अत्यंत निकटवर्तीयांपैकी एक. सध्या ते राजकारणात सक्रिय नाहीत. ८६ वर्षीय जोशींनी केंद्रीय अवजड उद्योगमंत्री, लोकसभा अध्यक्षपदही भूषविले आहे.

## नेरूळ-उरण रेल्वेमार्गावरील स्थानकांना महसुली, ऐतिहासिक, पारंपरिक गावांची नावे द्या

### आमदार महेश बालदी यांची केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरूळ-उरण रेल्वे लवकरच धावणार आहे. त्यामुळे या मार्गावर असलेल्या स्थानकांची महसुली तसेच ऐतिहासिक व पारंपरिक गावांनुसार ओळख कायम राहावी या अनुषंगाने रेल्वेस्थानकांना नावे देण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्याकडे मंगळवारी (दि. २३) दिल्ली येथे भेट घेऊन केली.

या वेळी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, माजी जि.प. सदस्य विजय भोईर, बोकडवीरा ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष व सरपंच मनोज पाटील, नवघर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रवी वाजेकर, धुतूम ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शरद ठाकूर आदी उपस्थित होते.

उरणला मुंबईशी जोडणाऱ्या बहुप्रतीक्षित नेरूळ-उरण रेल्वेमार्गाच्या दुसऱ्या टप्प्याच्या उभारणीचे काम आता पूर्ण झाले आहे. त्यामुळे सध्या नेरूळ ते खारकोपर या टप्प्यात धावणारी रेल्वे काही दिवसांतच थेट उरणला पोहचणार आहे. हा नवीन मार्ग सुरू झाल्यानंतर सीएसटीहून रेल्वेने थेट उरणला जाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या महिनाभरात ही रेल्वे सुरू होण्याचे संकेत मिळाले आहेत.

नेरूळ-उरण मार्गावरून रेल्वे धावताना महसूल अधिकार क्षेत्रात उभारण्यात आलेल्या रेल्वेस्थानकाला त्याच गावाचे देणे उचित ठरणार असून त्या ठिकाणी इतर नाव दिल्यास अन्यायकारी होणार आहे. याचा विचार आणि लोकभावना लक्षात घेता फक्त द्रोणागिरी असा उल्लेख न करता बोकडवीरा द्रोणागिरी, न्हावा शेवाऐवजी नवघर, रांजणपाडाऐवजी धुतूम असा करण्यात यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी या बाबतीत लक्ष घालून ग्रामस्थांच्या मागणीला न्याय मिळेल, असे आश्वस्त केले.

## क्रिकेट सट्टेबाजीत पैसे हरल्याने तरुणाची आत्महत्या

### आईनेही संपवली जीवनयात्रा

**नागपूर : प्रतिनिधी**

सट्टेबाजीच्या कर्जामुळे तणावात असलेल्या युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. मुलाच्या मृत्यूच्या धक्क्याने आईनेही विष प्राशन करून जीवनयात्रा संपवली. मायलेकाच्या आत्महत्येच्या घटनेमुळे उपराजधानी हादरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे. खितेन नरेश वाघवानी आणि दिव्या वाघवानी असे मृत मायलेकांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील मसाले व्यावसायिक नरेश वाघवानी यांचा मुलगा खितेन हा शिक्षण घेत वडिलांना मसाला विक्रीत मदत करीत होता, मात्र तो चुकीच्या संगतीत लागला व त्याला क्रिकेट सट्टेबाजीच्या जुगाराची व्यसन लागले. मागील वर्षी तो सट्ट्यात काही लाख रुपये हारला होता. ही बाब त्याने कुटुंबीयांना सांगितली व त्याचे वडील ते पैसे हळूहळू देत होते. खितेनने यंदा परत मित्रांच्या सांगण्यावरून आयपीएलच्या सामन्यांवर पैसे लावले, मात्र गेल्या महिन्याभरात तो जवळपास सहा ते सात लाख रुपये हारला. सट्टेबाज पैशांसाठी त्रास देऊ लागले व यातून खितेन तणावात गेला. घरी कुणीच नसताना त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

मुलाने आत्महत्या केल्याचे दु:ख त्याची आई दिव्या पचवू शकली नाही. सकाळी मुलावर अंत्यसंस्काराची तयारी सुरू असताना दिव्या यांनी विष घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## पंढरपूर मंदिर, अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २३) झालेल्या राज्य शिखर समितीच्या बैठकीत ७३ कोटी ८० लाख रुपयांच्या पंढरपूर मंदिर विकास आराखडा आणि ३६८ कोटी रुपयांच्या अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील उपस्थित होते.

राज्यातील ज्या मंदिर, देवस्थानांमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते त्यांचे डिजिटल मॅपिंग करण्यात यावे, जेणेकरून भाविकांना अधिकाधिक चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरातील



सर्व रस्त्यांची दुरूस्ती करण्यात यावी. रस्त्यावर एकही खड्डा दिसता कामा नये. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाने तातडीने १० कोटी रुपयांचा निधी पंढरपूर नगर परिषदेस वितरीत करावा, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी दिले.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, वारकरी केंद्रबिंदू ठेवून पंढरपूर मंदिर विकास आराखड्याची अंमलबजावणी करा. मंदिराचे प्राचीन वैभव कायम ठेवत भाविकांची सुरक्षा आणि सोयीसुविधा यांची सांगड घालण्याचे काम करा. यात्रेसाठी लाखो भाविक पंढरपूरात येत असतात अशावेळी घाट सुशोभीकरण, रस्ते दुरूस्ती तसेच विविध सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

या वेळी अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबतही चर्चा झाली. ३६८ कोटी ७१ लाख रुपयांच्या आराखड्यामध्ये करण्यात येणाऱ्या कामांबाबत चर्चा झाली. वाहनतळ, रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक त्या भुसंपादनाला मंजुरी देण्यात आली. प्रस्तावित आराखड्यामध्ये वाहनतळ, वॉटर एटीएम, रस्ते विकास, शौचालय निर्मिती, हत्ती तलाव उद्यानांचा विकास, व्यापारी केंद्र, भक्त निवास, चौक सुशोभीकरण या कामांचा समावेश आहे.

या बैठकीस खासदार जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, आमदार सर्वश्री सचिन शेट्टी, सुभाष देशमुख, समाधान अवताडे, शहाजीबापू पाटील, राम सातपुते, रणजीतसिंह मोहिते-पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

## सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा ३ जूनला पारितोषिक वितरण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २२व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय या सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ३ जून रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबईत मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकासमोरील मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात होणाऱ्या या सोहळ्यास विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुण गुजराथी, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे.



वाचन संस्कृतीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण असलेल्या या सोहळ्याचा साहित्यप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे, शैलेंद्र शिर्के, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, कार्यवाह संदीप चव्हाण यांनी केले आहे.

### असे आहे बक्षिसांचे स्वरूप

राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस एक लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार, तर तृतीय क्रमाकांस ३० हजार रुपये तसेच तिन्ही विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट विशेषांकासाठी १५ हजार रुपये, बालसाहित्य अंकासाठी ७५०० रुपये, उत्कृष्ट दिवाळी अंकासाठी १५ हजार रुपये, उत्कृष्ट कथा, उत्कृष्ट कविता, उत्कृष्ट मुखपृष्ठ व उत्कृष्ट व्यंगचित्रासाठी प्रत्येकी तीन हजार रुपये त्याचबरोबर सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह तसेच रायगड जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रूपये आणि तृतीय क्रमाकांस १० हजार रुपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी पाच हजार रुपये आणि उत्कृष्ट कथा, उत्कृष्ट कविता व उत्कृष्ट व्यंगचित्रासाठी प्रत्येकी तीन हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्हे देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

# काँग्रेसने देशाची माफी मागावी




## ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची मागणी
## ■ शिवरायांशी राहुल गांधींची तुलना केल्याबद्दल संताप

**मुंबई : प्रतिनिधी**

राहुल गांधींची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केल्याबद्दल काँग्रेसने तातडीने देशाची माफी मागावी अन्यथा आंदोलन करू असा इशारा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी(दि.२३) दिला. भाजपा प्रदेश कार्यालयात ते पत्रकारांशी बोलत होते. भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, चैनसुख संचेती , प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. नवाब मलिक यांच्या अटकेबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महाराष्ट्राची दिशाभूल करू नये, असेही त्यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, काँग्रेस पक्षाकडून प्रसारीत केल्या गेलेल्या एका व्हिडिओमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी तुलना करण्यात आली आहे. या प्रकाराबद्दल काँग्रेसने तातडीने देशाची माफी मागावी, अन्यथा भारतीय जनता पक्ष याविरोधात आंदोलन करेल.

मुंबईत बॉम्बस्फोट घडविणाऱ्या देशद्रोही दाऊद इब्राहिम टोळीशी संबंध असल्याच्या आरोपावरून राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांना अटक करण्यात आली आहे. समीर वानखेडे यांच्यावर केलेल्या आरोपांचा आणि नवाब मलिक यांच्या अटकेचा काहीच संबंध नाही. मात्र शरद पवार यांना जनतेची दिशाभूल करण्याची सवय आहे. या सवयीतूनच पवार यांनी नवाब मलिक यांच्या अटकेबाबत चुकीची माहिती दिली आहे. पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने जनतेत या पद्धतीने संभ्रम पसरवू नये, असे ते म्हणाले.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भारतीय जनता पक्षाने प्रवेशाचे निमंत्रण दिलेले नाही, अजित पवारांनीही भारतीय जनता पक्षामध्ये येण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही. असे असताना अजित पवार राष्ट्रवादी सोडणार असल्याच्या बातम्या वारंवार पसरवल्या जात आहेत. महाविकास आघाडीच्या नेत्यांकडूनच अजित पवारांची बदनामी केली जात आहे, असेही सांगितले.

या पुढे प्रदेशाध्यक्ष यांनी सांगितले की, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना न्यायालयाने प्रकृतीच्या कारणास्तव जामीन मंजूर केला आहे. देशमुखांवरील आरोपांची सुनावणी न्यायालयात अजून सुरु असताना खुद्द अनिल देशमुख न्यायालयाबाबत मतप्रदर्शन करीत असल्याने न्यायालयाचा अवमान होत आहे. देशमुख यांनी या बाबत जाहीर वक्तव्ये न थांबविल्यास न्यायालयाकडे त्यांची तक्रार करू, असेही ते म्हणाले.

# राज्यात एनसीसीच्या विस्तारासाठी शासनाकडून सर्व सहकार्य –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



लष्करी शिस्तीचे विद्यार्थ्यांना घडवणारे संघटन म्हणून राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसीची ओळख आहे. राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा यात सहभाग वाढावा यासाठी राज्यात एनसीसी विस्तार करत आहे, या प्रक्रियेला राज्य शासनाकडून सर्व आवश्यक सहकार्य देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

राष्ट्रीय छात्र सेनेचे महासंचालक गुरुबीर पाल सिंग यांनी मंगळवारी (दि.२३) मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, एनसीसीच्या महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक योगेंद्र प्रसाद खंडूरी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यातील विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर सातत्याने चांगली कामगिरी करत असतात. लष्करी शिस्त, देशप्रेम अंगी बाणविणाऱ्या एनसीसी मध्ये सहभागासाठी राज्यातील तरुणांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणावर असतो. राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना एनसीसीमध्ये सामावून घेण्यासाठी महाराष्ट्र एनसीसीचे विद्यार्थी संख्या वाढविण्याचे नियोजन आहे. या जागा वाढल्यानंतर सध्या एनसीसीत सहभागी होणाऱ्या सव्वा लाख विद्यार्थ्यांची संख्या ६० हजाराने वाढणार आहे. या अतिरीक्त जागा वाढविण्यासाठी लागणारे सर्व आवश्यक सहकार्य राज्य शासनाच्या युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या माध्यमातून महाराष्ट्र एनसीसीला करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. याबाबत केंद्र शासनाकडे निधी आणि अनुषांगिक बाबींसाठी पाठपुरावा करण्याचीही ग्वाही दिली.

सुरुवातील गुरुबीर पाल. सिंग यांनी महाराष्ट्रातील एनसीसीच्या विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा मुख्यमंत्र्यांसमोर सादर केला.

# नवी मुंबईच्या शिरपेचात स्टार म्युनिसिपल लिडरशीप वॉर्डचा मानाचा तुरा

**नवी मुंबई : बातमीदार**

'अर्थ डे नेटवर्क इंडिया' या मानंकित संस्थेच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त पर्यावरण क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या शहरांचा 'अर्थ डे नेटवर्क स्टार म्युनिसिपल लिडरशीप वॉर्ड' ने गौरव करण्यात आलेला आहे. यामध्ये 'सिंगल यूज प्लास्टिक फ्री कार्यालय' करून प्लास्टिक फ्री शहराकडे वाटचाल करणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेस 'स्टार म्युनिसिपल लिडरशीप वॉर्ड' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

या अनुषंगाने संस्थेमार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या ई बुकमध्ये नवी मुंबईच्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक कामगिरीचा विशेष उल्लेख करण्यात आलेला आहे. या पुरस्काराचे प्राप्त झालेले सन्मानचिन्ह नवी मुंबईकर नागरिकांनी याकामी दिलेल्या सक्रीय सहभागामुळे प्राप्त झाले असल्याचे नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगत हा पुरस्कार नवी मुंबईकर नागरिकांना समर्पित केलेला आहे. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त ढोले, शहर अभियंता संजय देसाई व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे



उपआयुक्त बाबासाहेब राजळे उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेस मिळालेला 'स्टार म्युनिलिपल लिडरशीप वॉर्ड' हा राष्ट्रीय स्तरावरील आणखी एक पुरस्कार नवी मुंबईच्या नावलौकीकात भर घालणारा असून महापालिका मुख्यालयाप्रमाणेच संपूर्ण नवी मुंबई शहर सिंगल यूज प्लास्टिक फ्री करण्यासाठी महानगरपालिका कटिबध्द आहे. याकामी नागरिकांनी संपूर्ण सहयोग द्यावा आणि प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# त्र्यंबकेश्वर मंदिरात धूप दाखविण्याची परंपरा नाही

## भाजप आध्यात्मिक आघाडीचे संयोजक आचार्य भोसले यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर मंदिरात संदल आयोजित करणाऱ्या मंडळींकडून धूप दाखविण्याची कोणतीही परंपरा नसताना मंदिरात प्रवेश करण्याचा हट्ट काही जणांनी धरल्यामुळे मंदिर समितीने पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष चौकशी समिती नेमली असून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे आध्यात्मिक आघाडीचे संयोजक आचार्य तुषार भोसले यांनी सोमवारी(दि.२३)केले. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, माध्यम विभाग सह संयोजक ओमप्रकाश चौहान यावेळी




उपस्थित होते. मंदिरासमोर धूप दाखविण्याची १०० वर्षांची परंपरा असल्याचा दावा करणाऱ्या खा. संजय राऊत यांनी याचे पुरावे द्यावेत असे आव्हान आचार्य भोसले यांनी दिले.

आचार्य तुषार भोसले यांनी सांगितले की, त्र्यंबकेश्वर मंदिरासमोर धूप दाखविण्याच्या घटनेबाबत राज्यात बरीच चर्चा चालू आहे. मंदिरासमोर धूप दाखविण्याची प्रथा १०० वर्षांपासूनची आहे, असा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. खा. राऊत यांचा हा दावा सपशेल खोटा आहे. या घटनेसंदर्भात स्थानिक शांतता समितीने पत्रकार परिषदही घेतली होती. त्या पत्रकार परिषदेत मंदिराबाहेरच्या चौकात धूप दाखविण्याची प्रथा आहे, असे सांगण्यात आले होते. असे असताना काही मंडळी या वादाला विनाकारण वेगळे वळण देत आहेत.

प्रत्येक मंदिर, धार्मिक स्थळात प्रवेशाबाबत वेगवेगळे नियम असतात. त्र्यंबकेश्वर मंदिरात कोणाला प्रवेश द्यावा याचे नियम मंदिर समितीने केले आहेत. या मंदिरात प्रवेश करून धूप दाखविण्याची कोणतीही परंपरा नव्हती. चौकात धूप दाखविण्याची परंपरा असताना यावर्षी काही व्यक्तींनी मंदिरात प्रवेश करून धूप दाखविण्याचा हट्ट धरल्यामुळे मंदिर समितीने त्यांच्याविरुद्ध पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या प्रकरणी ज्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला त्यापैकी एक असलेल्या सलमान अकील सय्यद याच्याविरुद्ध २०१८ मध्ये अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून त्याच्याविरुद्ध नाशिक न्यायालयात खटला चालू आहे, उरूस आयोजकांपैकी काही मंडळी गुन्हेगारी कृत्यांशी संबंधित असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले आहे, अशी माहितीही आचार्य भोसले यांनी दिली. ही माहिती आपण विशेष चौकशी समिती (एसआयटी) कडे देणार आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

# बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची सुविधा आपल्या गावातच!

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटूंबास रु.२ हजार प्रति हप्ता याप्रमाणे रु.६ हजार प्रतिवर्षी लाभ देण्यात येतो. या योजनेच्या १४ व्या हप्त्याचा लाभ मे किंवा जून २०२३ मध्ये जमा होणार आहे. केंद्र शासनाने १४ व्या हप्त्याचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी त्यांचे लाभ जमा करावयाचे बँक खाते आधार क्रमांकास जोडणे बंधनकारक केले असून आयपीपीबी मार्फत गाव पातळीवर सर्वत्र मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा कालावधी दि.३० मे २०२३ पर्यंत वाढविण्यात आला आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा समन्वय अधिकारी संदेश शिर्के यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात सद्य:स्थितीत २३ हजार ५ लाभार्थ्यांची बँक खाती त्यांच्या आधार क्रमांकास जोडलेली नाहीत. तसेच १२ हजार ४३० लाभार्थ्यांचे e-KYC प्रमाणिकरण झालेले नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांच्या खात्यात १४ व्या हप्त्याचा लाभ जमा होणार नाही.

**मोहीम कालावधीस ३० मेपर्यंत मुदतवाढ**

लाभार्थींना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाची जोडण्याची सुविधा त्यांच्या गावातील पोस्ट मास्तर यांच्यामार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी आधारकार्ड, मोबाईल क्रमांक या कागदपत्रांच्या आधारे आपल्या गावातील पोस्ट विभागाचे कर्मचारी यांच्यामार्फत इंडिया पोस्ट पेमेंट बँक (आयपीपीबी) मध्ये खाते उघडावे. हे बँक खाते आपल्या आधार क्रमांकाशी ४८ तासात जोडला जाईल. ही पद्धत कोणत्याही अतिरिक्त कागदपत्रांशिवाय करता येणार असल्याने अत्यंत सोपी व सुलभ आहे. आयपीपीबी मध्ये बँक खाते सुरू करण्याची सुविधा आपल्या गावातील पोस्ट कार्यालयातच उपलब्ध असल्याने लाभार्थींना इतरत्र जाण्याची गरज पडणार नाही.

पी.एम.किसान योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांची बँक खाती आयपीपीबी मध्ये उघडून ती आधार क्रमांकास जोडण्यासाठी राज्याच्या आयपीपीबी कार्यालयास आयुक्त कृषी कार्यालयामार्फत गावनिहाय याद्या उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याप्रमाणे गावातील पोस्ट मास्तर या लाभार्थींना संपर्क करून आयपीपीबी मध्ये बँक खाती सुरू करतील. योजनेच्या १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी आधार संलग्न बँक खाते अनिवार्य केले असल्याने आयपीपीबी मार्फत गाव पातळीवर सर्वत्र मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा कालावधी दि.३० मे २०२३ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

आयपीपीबी मार्फत आयोजित या मोहिमेमध्ये राज्यातील सर्व प्रलंबित लाभार्थींनी त्यांचे बँक खाते उघडावे. तसेच ज्या लाभार्थ्यांचे ई–केवायसी प्रमाणिकरण झालेले नाही, अशा लाभार्थींनी ई–केवायसी प्रमाणिकरण दि.३० मे २०२३ पूर्वी करुन घ्यावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा समन्वय अधिकारीसंदेश शिर्के यांनी केले आहे.

# नोकरी इच्छुक बेरोजगार उमेदवारांसाठी संधी

## पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा २७ मे रोजी खालापुरात

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग यांच्यामार्फत दि.२७ मे २०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत श्री समर्थ मंगल कार्यालय, समर्थ ढाबा शेजारी, जाधव फार्म, मुंबई–पुणे हायवे, खोपोली, ता.खालापूर या ठिकाणी नोकरी इच्छुक बेरोजगार उमेदवारांसाठी शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नामांकित आस्थापनांकडील रिक्त पदांच्या भरतीसाठी महारोजगार मेळावा आयोजित केला आहे. या महारोजगार मेळाव्यात एस.एस.सी./एच.एस.सी पास, आय.टी.आय.डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, व इतर पदवीधारक नोकरी इच्छुक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या पंडित दीनदयाळ महारोजगार मेळाव्यास स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या बेरोजगार युवकासाठी जिल्ह्यातील विविध महामंडळे यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजना विषयीची माहिती उमेदवारांना दिली जाणार आहे.

या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. àW' https://rojgar.mahaswayam.gov.in, या संकेतस्थळावरील Employment Job Seeker (Find - Job) Job Seeker Login या क्रमाने जाऊन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहिती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ॲप मधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listing -gree व दिसणाऱ्या विविध पदांसाठी आपल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ऑनलाईन अर्ज करावेत.

महारोजगार मेळाव्यातील रिक्त पदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in, या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०२९ किंवा महेश भा.वखरे, लिपिक–टंकलेखक यांच्या ९४२१६१३७५७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार युवकांनी या महारोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु. पवार यांनी केले आहे.

## दुखवटा

### नजीर बकवाल




**मुरुड जंजिरा :** काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते नजीर हिशामोद्दीन बकवाल यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७० व्या वर्षी निधन झाले आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य होते. मुलांच्या शैक्षणिक भविष्यासाठी विविध शिबीर घेऊन विविध सेवा त्यांनी मिळून दिल्या होत्या. सध्या ते एम.आय. घोले ट्रस्ट चे अध्यक्ष होते. सामाजिक क्षेत्रात त्यांनी अद्वितीय कार्य असल्याने त्याच्या अंतयात्रेस मोठ्या संख्येने विविध समाजातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी व पत्नी असा परिवार आहे.

### बाळकृष्ण म्हात्रे



**उरण :** तालुक्यातील कोप्रोली गावातील सामाजिक कार्यकर्ते बाळकृष्ण पुंडलिक म्हात्रे यांचे गुरुवार दि १८ मे २०२३ रोजी अल्पशा आजाराने दुख:द निधन झाले. श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे राज्य सोशल मीडिया प्रमुख साहिल म्हात्रे यांचे ते वडिल होते. मृत्यूसमयी त्यांचे वय ५४ होते. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांना एक मूलगी व एक मुलगा असा त्यांचा परिवार आहे. त्यांच्या निधनाने म्हात्रे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. कै. बाळकृष्ण म्हात्रे यांचा दशक्रिया विधी शनिवार दि २७ मे २०२३ रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर (उरण) येथे तर तेरावा विधी रविवार दि २८ मे २०२३ रोजी त्यांच्या राहत्या घरी कोप्रोली येथे होणार आहे.

# एसआरटी पीक लागवड म्हणजे काय?



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि.२३) एसआरटी शेतकऱ्यांचा कृषी सन्मान सोहळयात सदर तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात येईल अशी घोषणा केली. सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्र दहिवली, नेरळ येथे कार्यक्रम पार पडला यात मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

'एसआरटी' म्हणजे भूमातेवर नांगरणीचे अत्याचार न करता, धूप थांबवून, नैसर्गिक गांडूळ निर्मितीला चालना देऊन जमिनीचा सेंद्रिय करब वाढवून तसेच उत्पादनात निश्चित वाढ करून शेतकऱ्यांना आनंदी व आत्मविश्वासी करणारी पिकरचना. दरम्यान जमिनीची धूप न होता, कमी खर्चात नांगरणी, चिखलणी आणि कोळपाणी न करता, भरघोस उत्पन्न देणारी शेती पध्दती शेतकऱ्यांना आवडली. एका वर्षात किमान तीन पीके एसआरटी पध्दतीने घेता येत असल्याने अनेक राज्यातील शेतकरी आकर्षित झाले आहेत. चंद्रशेखर भडसावळे आणि त्यांच्या टीमने २०११ मध्ये सगुणा रिजनरेटिव्ह टेक्निक म्हणजे एसआरटी तंत्र शोधून काढले आणि त्याचा वापर होवू लागला आहे.

खर्चाच्या व कमी कष्टाच्या ह्या तंत्रात शेतकऱ्यांचे जमिनीच्या मशागतीचे दिवस व हंगाम साधायचे अती मूल्यवान १०–१५ दिवस हातात मिळतात. पहिल्या पिकाची मुळे वाफ्यात शिल्लक ठेवल्याने पुढच्या पिकाच्या सेंद्रिय कर्बाची गरज भागते. मुळांच्या जाळीमुळे पाण्याचा ताण पडला तरी जमीन भेगाळत नाही. सशक्त जमिनीतील रोपांना रोग व किडी फार कमी प्रमाणात त्रास देतात. पिकांच्या रासायनिक खताच्या गरजेचे प्रमाण व विषारी कीटकनाशकांच्या फवारणीचे प्रमाण दरवर्षी कमी कमी होत जाते. शिवाय उत्पन्नांत तिपटीने वाढ होते हे महत्त्वाचे.

एसआरटी पीक पध्दतीत एकदा तयार केलेले गादीवाफे पुढील किमान २० वर्षे मोडण्याची गरज नसते. सगुणा बागेत बीजांच्या टोकणणीसाठी एक साचा विकसित करण्यात आला आहे. पिकांचे योग्य नियोजन केल्यास वर्षातून किमान तीन पीके घेता येणे या पध्दतीत सहज शक्य होते. साध्या महाराष्ट्रातील विविध भागात एसआरटीच्या त्याच गादीवाफ्यावर अनेक पिके घेतली जात आहेत. जसे की खरिपात भात, नाचणी, वरी, भुईमूग, कापूस, सोयाबीन, कांदा, मका, कारळ/खुरासणी व रब्बी मध्ये गहू, कलिंगड, टोमॅटो, मिरची, वांगी, कारली, शिरली, दुधी, मटार/वाटाणा, पालेभाज्या इत्यादी पीके घेता येतात.

सर्व प्रकारच्या भौगोलिक व पावसाळी प्रदेशात देखील एसआरटी ही पध्दत फायदेशीर ठरणारी असल्याने खुद्द राज्य शासनाच्या कृषी विभागाने हे तंत्रज्ञान शेतकरी वर्गापर्यंत पोहचण्यासाठी विशेष मोहिम सुरु केली आहे. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून राज्यातील अनेक तालुक्यातील शेतकऱ्यांचे अभ्यास दौरे कृषी विभागाने आयोजित करण्यावर भर दिला आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत दुष्काळ प्रवण भागातील कृषी अधिकाऱ्यांना सगुणाबागेत प्रशिक्षण दिले जात आहे. शेतकऱ्यांसाठी एक दिवशीय प्रशिक्षण सगुणा रुरल फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केले जाते. त्याचा लाभ शेकडो शेतकऱ्यांनी घेतला आहे. पाऊस कमी असलेल्या भागातील शेतकऱ्यांसाठी ही नवीपध्दती वरदान ठरत असल्याचे दिसून येत आहे.

यंदाचे वर्ष तृणधान्याचे वर्ष आहे. तृणधान्याचे महत्व लक्षात घेऊन एसआरटी पध्दतीने त्यांचे उत्पन्न कसे वाढेल यावर अधिक संशोधन सगुणा फाऊंडेशन करीत आहे. एसआरटी प्रसारासाठी कृषी पदवी आणि पदविका घेणारे असंख्य तरूण शेतकरी या कार्यात सहभागी झाले आहेत. नापीक जमिनीत तणांचे पीक घेऊन तिला सुपीक करण्याचे तंत्र विकसित करण्यावर आता लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे.

एसआरटी तंत्र हे शून्य मशागत, संवर्धित शेतीचा प्रकार आहे. सगुणा राईस तंत्र हे भात शेतीसाठी विकसित झाले असून या पध्दतीने ३० ते ३५ प्रकारची विविध पिके घेता येतात. खरिपात (जून–ऑक्टोंबर) भात, नाचणी (नागली), वरी, भूईमुग, कापूस, सोयाबीन, तुर, उडीद इ. तसेच रब्बीमध्ये (नोव्हेंबर–फेब्रुवारी) सर्व कडधान्ये उदा. वाल (पोपट), हरभरा, चवळी, काळे मूग, हुलगा (कुळीथ), वाटाणा, मसूर, विविध पालेभाज्या, फळभाज्या, कांदा, लसूण, कोबी, भेंडी, मका, सूर्यफूल, गहू, ज्वारी, करडई इ.व त्यानंतर उन्हाळ्यात (जानेवारी–मे) वैशाखी मूग, भूईमुग, भेंडी, सूर्यफुल, बाजरी अशी फेरपालट पिके घेऊ शकतो. ही पध्दत सगुणा बाग नेरळ जि.रायगड येथे सन २०११ साली विकसित झाली आहे. एकूणच या तंत्रज्ञानाचा लाभ शेतकऱ्यांनी घेणे आवश्यक आहे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

**उपसंचालक (माहिती)**
**कोकण विभाग, नवी मुंबई.**

## निवडक

### झाड पडून दोन रिक्षांचे नुकसान

**पनवेल :** खारघरमधील ओवे गावात रस्त्यावर चिंचेचे झाड पडल्याने रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला असून या घटनेत दोन रिक्षांचे नुकसान झाले आहे. खारघर सेक्टर ३० मधील ओवे गावातील अन्वर पटेल यांच्या घरासमोरील चिंचेचे झाड रात्री वाऱ्यामुळे रस्त्यावर उन्मळून पडले. यामुळे झाडालगत उभ्या असलेल्या दोन रिक्षांचेदेखील या दुर्घटनेत नुकसान झाले आहे. पनवेल महापालिकेने हे झाड तत्काळ हटवावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

### जांभिवली कातकरवाडीतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील जांभिवली कातकरवाडी येथून एक २७ वर्षीय तरुण बेपत्ता झाला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. अर्जुन रामदास पवार असे या तरुणाचे नाव असून त्याची उंची पाच फूट चार इंच, रंग सावळा, केस काळे लांब वाढलेले, अंगाने सडपातळ, चेहरा उभट तसेच अंगात फुल बाह्यांचा लाल शर्ट, काळी ट्रॅक पॅन्ट व पायात काळी चप्पल घातली आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार सतीश जवरे (८३५६८१३७३२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डिझेल चोरणारा सराईत अटकेत

■ मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून ताब्यात ■ पनवेल पोलिसांची ठिकठिकाणी गस्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात गेल्या काही दिवसांपासून उभ्या असलेल्या वाहनांमधून डिझेल चोरी करण्याचा प्रकार वाढला असल्याने पनवेल तालुका पोलिसांचे पथक मुंबई-पुणे एक्स्प्रेस महामार्गावर गस्त घालत असताना उभ्या ट्रकमधून डिझेल चोरी करणाऱ्या चौकडीपैकी एका सराईत चोरट्यास या पथकाने ताब्यात घेतले आहे.



पनवेल परिसरासह नवी मुंबई, खालापूर, दांडफाटा, जुना मुंबई पुणे महामार्ग, एक्सप्रेसवे महामार्ग, पनवेल-पेण महामार्ग या ठिकाणी रस्त्यांवर, हॉटेल समोर व ढाब्यांवर उभ्या असलेल्या वाहनातून डिझेल चोरी करण्याचे प्रमाण गेल्या काही दिवसांपासून वाढले होते. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, पोलीस हवालदार महेश धुमाळ, सुनील कुदळे, नाईक पाटील व पोलीस शिपाई आकाश भगत, मासाळ आदींचे पथक एक्सप्रेस मार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास गस्त घालत होते. या वेळी रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकमधून काही व्यक्ती डिझेल चोरून पसार होण्याच्या तयारीत असताना या पथकाने धावत जाऊन त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यामध्ये इतर तिघेजण त्यांच्याजवळ असलेल्या स्विफ्ट गाडीतून चोरीच्या डिझेलसह पसार झाले.

**परिसरातील अन्य गुन्हेही उघडकीस येण्याची चिन्हे**

या वेळी त्यांचा एक साथीदार महादेव उर्फ महादू सत्य गौडा (वय ३७, रा. कोपरखैरणे) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहे. त्याच्या अटकेमुळे पनवेल परिसरात झालेले डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून दांडफाटा-खालापूर हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात डिझेल चोरीचे रॅकेट सुरू असून पोलिसांनी आता त्याठिकाणी लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे.

## जेसीबीची स्कूटीला धडक; दोन जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील करंजाडे येथील चिंचपाडा ब्रिजजवळ जेसीबी चालकाची एका स्कूटीला पाठीमागुन धडक बसल्याने अपघातात दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी जेसीबी चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करंजाडे सेक्टर आर ३ येथे राहणारे जयचंद चव्हाण (वय ४७) हे आपल्या आईसोबत स्कूटी (एमएच ४६ बीएल ०११२) वरून जात होते. या वेळी चिंचपाडा ब्रिज येथे त्यांच्या स्कूटीच्या मागुन येणारा जेसीबी (एमएच ४६ बीक्यु ०२४३) वरील चालकाची जयचंद यांच्या स्कूटीला पाठीमागुन धडक बसली. या धडकेत जयचंद यांची आई सनजाबी चव्हाण (वय ७०) यांच्या उजव्या पायाला, डाव्या हाताला व मानेजवळील हाडाला गंभीर दुखापत झाली तसेच जयचंद यांच्या डाव्या पायाला कंबरेला व डोक्याला दुखापत झाली.

याप्रकरणी जयचंद चव्हाण यांनी जेसीबी चालकाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा अधिक तपास शहर पोलीस करीत आहेत.

## समाजात जातीय तेढ पसरविणाऱ्यांवर कारवाई करा; रसायनी पोलिसांकडे मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) व रसायनी विभागातील भिम सैनिकांनी रसायनी पोलीस ठाणे येथे राज्यामधील धार्मिक जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. याकरिता निवेदन दिले आहे.

महाराष्ट्रामध्ये त्रंबकेश्वर येथील वादविवाद असेल अहमदनगर येथील मिरवणुकीदरम्यान झालेली दगडफेक असे अनेक प्रकार महाराष्ट्रात रोज घडत आहेत. अशातच काही दिवसांपूर्वी पूजा सावळे नामक महिलेने आगरी कोळी समाजाची आराध्य दैवत असलेल्या एकविरा देवी बद्दल अपशब्द काढल्याने महाराष्ट्रातील लोकांची धार्मिक भावना दुखावली गेली. पूजा सावळेच्या वक्तव्याचा गैरवापर करत अनेक लोक हे बौद्ध बांधवांना, आंबेडकरी समूहाला टार्गेट करून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सोशल मीडियावर करत आहे. सोशल मीडियावर संबंध बौद्ध समाजाला, आंबेडकरी समाजाला टार्गेट करत असल्याने आपल्या विभागामध्ये सुद्धा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशा प्रकारचे वक्तव्य बाहेर येत आहेत. या विषयावर पोलीस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन आपल्या विभागामध्ये शांततेचे वातावरण ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले.

या वेळी रसायनी परिसरातून आकाश कांबळे, आशिष जाधव, दिपक कांबळे, पंकज सोनावळे, आर. के. कांबळे, शांताराम सोनावळे, के. डी. जोशी, शुद्धोधन त्रिभुवन, प्रमोद जाधव , गौतम दिवे आदी उपस्थित होते.

दरम्यान, नागरिकांनी समाजात तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही घटनांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अफवांवर विश्वास ठेवू नका; पोलिसांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या नागरिकांनी समाजात तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही घटनांवर विश्वास ठेवू नये तसेच कोणतेही आक्षेपार्ह पोस्ट किंवा मजकूर निदर्शनास आल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दिलीप गुजर यांनी केले आहे.

मागील काही काळात महाराष्ट्रामध्ये काही समाजकंटकांकडून धार्मिक व जातीय तेढ निर्माण केले जात आहे. या पार्श्वभूमीवर कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी कळंबोली हद्दीतील सर्व जाती-धर्माचे लोक एकोप्याने राहावे यासाठी रहिवाशांना समाजात तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही घटनांवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे. तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडवणारी कोणतीही पोस्ट, क्लिप, मजकूर निदर्शनास आल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, अश्या सूचना केल्या आहेत.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** तालुक्यातील चिंचवण गाव येथील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपनयन झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात फुस लावुन कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. चिंचवण गाव येथील बुद्ध मंदिराच्या बाजूला राहणाऱ्या या मुलीला एका व्यक्तीने कशाची तरी फुस लावुन कायदेशीर रखवालीतून पळवून नेले आहे. या मुलीची उंची पाच फूट दोन इंच असून तिचा रंग गोरा, अंगाने मजबूत, नाक सरळ, चेहरा गोल, केस काळे लांब, डोळे काळे असा वर्णन आहे. तसेच तिला मराठी, हिंदी भाषा बोलता येते. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र जगदाळे (मो.९४०४९३०२६८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कळंबुसरे येथे रक्तदान शिबिर आणि पुरस्कार वितरण सोहळा

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य समीर शंकर म्हात्रे यांनी या संस्थेची स्थापना केली. सायरा समीर म्हात्रे शैक्षणिक सामाजिक संस्था कळंबुसरे या संघटनेच्या वतीने रविवार ४ जून २०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत रक्तदान शिबिराचे तर सकाळी १० वाजता विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध सामाजिक संस्था, संघटनांना या वेळी आदर्श सामाजिक संस्था पुरस्कार २०२३ ने गौरविण्यात येणार आहे.

रक्तदानासाठी समर्पण ब्लड बँक घाटकोपर यांचे विशेष सहकार्य लाभणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन करण्यात आले आहे. रक्तदान करणाऱ्या इच्छुकांनी नाव नोंदणी तसेच अधिक माहितीसाठी अध्यक्ष समीर म्हात्रे (९५९४०७६६५७), उपाध्यक्ष सचिन पाटील (८४१९५४०८६०), सचिव संजय म्हात्रे (९५९४२६५१८८), कार्याध्यक्ष पदमाकर पाटील (७०४५२३१७३६), खजिनदार शैलेश भोजने (९८२१२०६८२१), सल्लागार विठ्ठल ममताबादे (९७०२७५१०९८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



पनवेल : माजी नगरसेवक डी. आर. भोईर यांचे भाऊ गोपाळ रघुनाथ भोईर यांची कन्या सोनाली आणि अजिंक्य यांचा विवाह रविवारी व्ही. के. हायस्कूल येथे मोठ्या उत्साहात झाला. या वेळी वधू-वरास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, वैभव भोईर, विठ्ठल वावळे यांनी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : देवद येथील मोतीराम पाटील यांची कन्या सावित्री हिचा विवाह शिवकर येथील भगवान पाटील यांचे पुत्र योगेश यांच्यासोबत झाला. वधू-वरास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विवाहाप्रित्यर्थ शुभेच्छा दिल्या. या वेळी केशव पालेकर, विनोद वाघमारे, दिनेश वाघमारे, संजय पाटील, राजेंद्र पाटील, राहुल पाटील उपस्थित होते.





कामोठे : सेक्टर १९ येथे डॉ. सुरज चव्हाण आणि डॉ. सीमा चव्हाण यांनी सुरू केलेल्या अनुष क्लिनिकचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. संजय परदेशी, डॉ. शिर्ली मकवाना, मंगेश गावडे आदी उपस्थित होते.

## खराब आंबे विकून ग्राहकांची फसवणूक

**उरण : रामप्रहर वृत्त**

उन्हाळी मोसम म्हणजे जांभळे, करवंदे, फणस आणि फळांचा राजा हापूस आंबा या रानमेव्याने ओथंबून गेलेला हंगाम याला उरण बाजारपेठ अपवाद नाही. कोणताही माल ग्राहकांच्या माथी मारण्यात तरबेज असणारे काही विक्रिते बेमालूमपणे आंब्याची विक्री करत आहेत. ग्राहकांनी खरेदी केलेला हा आंबा कापून पहिला की एक डझन आंब्यांतील कमीतकमी तीन ते चार आंबे हे जाळीदार असल्याचे निष्पन्न होत असल्याने ग्राहकांची फसवणूक होत आहे.

काही विक्रेते हे आपण आंब्याची बागच विकत घेतल्याचे भासवून चक्क नवी मुंबई वाशीच्या फळबाजारांतून आणलेल्या पेट्यांतील आंबा हा आपल्याच बागेतील असल्याचे भासवून चढ्या भावात विक्री करतात. बाजारपेठेत अलिबाग-रेवसकडून येणारा आंबाही आपल्याच घरातील परसबागेतील आंबा असल्याचे भासवित विक्री करण्यात येतो, परंतु प्रत्यक्षात हा आंबा त्यांनी साठेवाल्यांकडून विकत घेतलेला असतो. यामध्ये काही आंबे विक्रेते हे वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे आंबा विकण्याचा व्यवसायही उरणच्या बाजारपेठेत करीत आहेत.

आंबे तपासून घेण्याचे कोणतेही प्रमाण नसल्याने ते प्रत्यक्षात तपासून घेता येत नाहीत. त्यामुळे चढा भाव देऊनही घरी घेऊन गेलेल्या एक डझन आंब्यातून सुमारे तीन ते चार आंबे आंतून जाळीदार झालेले निघतात व ते खण्यास अयोग्य असतात त्यामुळे ग्राहकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

**असे ओळखा चांगले आंबे**

**आंबे निवडणार असाल तर त्याला कोणतेही प्रमाण नसले तरी, मात्र बादलीभर पाण्यात आंबे टाकले तर त्यातील जे आंबे पाण्यावर तरंगतील ते आतून हमखास जाळीदार अथवा खराब असतील आणि जे आंबे पाण्याच्या तळाला खाली जावून बसतील ते चांगले व खाण्यास योग्य आहेत असे समजावे. सध्यातरी हेच तपासणीचे प्रमाणसिद्ध झाले आहे.**



## खारघरमध्ये बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

### रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्तुत्य उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. २३) इयत्ता बारावी झालेल्या वाणिज्य व शास्त्र शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये असणाऱ्या करिअरच्या संधी या विषयावरती करिअर मार्गदर्शन करण्यात आले.

या करिअर मार्गदर्शनासाठी प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड हे प्रमुख वक्ते म्हणून वाणिज्य व शास्त्र शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनीना करिअर मंत्राज, विद्यार्थ्यांमध्ये असणारे गुण, अवगुन, पोटेन्शिअल तसेच बँकिंग, फॅशन डिझाइनिंग, व्यवस्थापन, ओषोणोग्राफी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सिनेमाग्रफी व अध्यापन या सर्व करिअर ऑप्शन बद्दल मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. या करियर मार्गदर्शनासाठी नवी मुंबई क्षेत्रातील वेगवेगळ्या उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावी झालेल्या सुमारे ६० पेक्षा जास्त विद्यार्थी व विद्यार्थिनीनी तसेच पालकांनी या करिअर मार्गदर्शनाचा फायदा घेतला. येणाऱ्या काळामध्ये या करिअर मार्गदर्शनाचा फायदा या सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे करिअर निवडताना नक्कीच होणार आहे.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष), रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निषा नायर तसेच पत्रकार बंधू सर्व उपस्थित होते. या करिअर मार्गदर्शनाचे आयोजन प्रा. महेश धायगुडे (समन्वयक, प्रवेश समिती) यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. तनुजा सुमन, प्रा. डॉ. फारुख शेख प्रा. विशाल देशमुख हे सर्वजण करिअर मार्गदर्शन यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सफिना मुकादम यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. महेश धायगुडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## पोळ, कोकाटे यांना पदोन्नती जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र दहशदवादविरोधी पथक, नवी मुंबई (एटीएस) येथे कार्यरत असणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अधिकराव महादेव पोळ यांची मुंबईच्या सहाय्यक पोलीस आयुक्तपदी तसेच खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष दत्तात्रय कोकाटे यांची खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारीपदी पदोन्नती जाहीर करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाने राज्यातील १४३ पोलीस निरीक्षकांची पोलीस उप अधीक्षक अथवा सहाय्यक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर पदोन्नती जाहीर केल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने आणि पोलीस आस्थापना मंडळाच्या शिफारशीने पोलीस अधिकाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेने तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असल्याचे गृह विभागाने आदेश काढले आहेत. यात पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत मान्यता देण्यात येत असल्याचेही राज्याच्या गृह विभागाने आदेश काढले आहेत. यामध्ये महाराष्ट्र दहशदवादीविरोधी पथक, नवी मुंबई (एटीएस) येथे कार्यरत असणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अधिकराव महादेव पोळ यांची मुंबईच्या सहाय्यक पोलीस आयुक्तपदी तसेच खान्देश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष दत्तात्रय कोकाटे यांची खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारीपदी पदोन्नती जाहीर करण्यात आली आहे.

याचप्रमाणे खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शिवदास शुक्ला यांची मुंबई सहायक पोलीस आयुक्तपदी, पनवेल महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस उप अधीक्षक संदीप वसंत भागडीकर यांची सुद्धा मुंबईच्या सहायक पोलीस आयुक्तपदी पदोन्नती करण्यात आली आहे. तसेच नवी मुंबई कोकण परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे वाचक पोलीस उप अधीक्षक शिवाजी ज्ञानदेव फडतरे यांची पेण विभागीय पोलीस अधिकारीपदी, प्रदीप गिरीजनाथ तिदार यांची नवी मुंबई डायल ११२ पोलीस उप अधीक्षकपदी पदोन्नती करून बदली जाहीर झाली आहे. पदोन्न्ती झालेल्या अधिकाऱ्यांचे सहकाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## संपादकीय

# गुलाबी नोटेचा संदेश

रिझर्व्ह बँकेने गुलाबी रंगाच्या दोन हजारांच्या नोटा परत घेण्याच्या दृष्टीने मोठा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे देशभर काहिसे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. खरेतर असा संभ्रम निर्माण होण्याजोगे काहीच घडलेले नाही, परंतु विरोधकांना पराचा कावळा करण्याची जणू सवयच जडून गेली आहे. त्याचे दुष्परिणाम संभ्रमाच्या रूपात सर्वांना अनुभवावे लागत आहेत.

**दोन हजारांची नोट ही एक तात्पुरती व्यवस्था होती. २०१६ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अचानक पाचशे आणि हजार रुपये मूल्याच्या नोटा रद्द करून साऱ्यांनाच धक्का दिला होता. देशभरात बाजारात खेळणाऱ्या एकूण चलनाच्या जवळपास ८० टक्के चलन नोटबंदीमुळे रद्दबातल ठरले. नोटा बदलून घेण्यासाठी कालावधीदेखील कमी होता त्यामुळे बँकांपुढे हजारोंच्या रांगा लागल्या. नोटबंदीचा त्रास अनेक लोकांना त्या वेळी झाला हे मान्य केले तरी या प्रचंड मोठ्या निर्णयामुळे झालेले लाभ कमी लेखता येत नाहीत. नोटबंदीपूर्वी देशातील सामान्य व्यवहार प्राय: रोख रकमेतच होत असत. नोटबंदीनंतर काळ्या पैशाला चांगलाच चाप बसला. शेजारील शत्रू राष्ट्र बनावट नोटा छापून भारताची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचे कारस्थान रचत होती, ती कारस्थाने पंतप्रधान मोदी यांनी एका झटक्यात हाणून पाडली. बनावट नोटांच्या काळ्या बाजारावर तसेच दहशतवादाला खतपाणी घालत पाकिस्तानचा गाडा चालत होता, त्याला खीळ बसली. सध्या पाकिस्तानमधील अर्थव्यवस्था पूर्णत: मोडकळीस आलेली असून पाकप्रणित दहशतवादाचे कंबरडेच मोडले आहे. हे सारे नोटबंदीच्या निर्णयानंतर घडले आहे हा योगायोग नव्हे. याबरोबरच रोख व्यवहार कमी होऊन डिजिटल व्यवहारांकडे सामान्य भारतीय नागरिक वळू लागला हा नोटबंदीचा सर्वांत मोठा लाभ म्हणता येईल. आजकाल तर रिक्षावाले, भाजीवाले, पानटपरीवाले अशांसारखे छोटे व्यावसायिकदेखील आवडीने डिजिटल व्यवहार पसंत करू लागले आहेत. खिशात किरकोळ रोकड ठेवून मोठ्या खरेदीसाठी सहज बाहेर पडता येते. त्यामुळे पाकिटमारीसारखा भुरटा गुन्हा करतानाही चोरांना चार वेळा विचार करावा लागत आहे. हे झाले नोटबंदीचे ढोबळ फायदे. या पलीकडेही अर्थव्यवस्थेला चांगली शिस्त लावण्याचे काम नोटबंदीमुळे झाले. दोन हजार रुपयांची नोट परत घेण्याविषयी रिझर्व्ह बँकेने काही दिवसांपूर्वी परिपत्रक जारी केले तेव्हा मोदीविरोधकांनी पुन्हा एकदा नोटबंदी आल्याची आवई उठवली. वास्तविक दोन हजारांची नोट सामान्य माणसाच्या आवाक्यातून कधीच निसटून गेली आहे. दोन-अडीच वर्षांपूर्वी दोन हजारांच्या नोटेची छपाई रिझर्व्ह बँकेने थांबवली आहे. एटीएम किंवा बँकेतही दोन हजारांच्या नोटा मिळणे कठीण झाले होते. विशेष म्हणजे दोन हजारांच्या नोटा बदलून घेण्यासाठी रिझर्व्ह बँकेने लोकांना चांगली चार महिन्यांची मुदत दिली आहे. या चार महिन्यांत कुठल्याही बँकेत ओळखपत्राविना नोटा सहजपणे बदलून मिळतील. इतकेच नव्हे तर चार महिन्यांनंतरदेखील या नोटा विधिसंमत चलन (लीगल टेंडर) म्हणून वैधच मानल्या जाणार आहेत. फक्त त्या चलनात नसतील. त्यामुळे दोन हजारांच्या नोटेवरून विरोधकांनी जो गदारोळ सुरू केला आहे तो हास्यास्पद आणि अज्ञानमूलक वाटतो. रिझर्व्ह बँकेच्या क्लीन नोट धोरणानुसार हा निर्णय झाला असून त्याचा केंद्र सरकारशी काहीही संबंध नाही. आर्थिक शिस्त सांभाळण्यासाठी अशा प्रकारचे वित्तीय नियमन करणे हेच तर रिझर्व्ह बँकेचे प्रमुख कार्य आहे.**

# पनवेलच्या वडाळे तलावाची शान जपा!

खबरबात
नितीन देशमुख



पनवेल म्हटले की सर्वांच्या डोळ्यासमोर उभे राहते ते म्हणजे वडाळे तलावाचे विहंगम दृश्य. पनवेल महानगरपालिकेने वडाळे तलावाचे विलोभनीय सुशोभीकरण नुकतेच पूर्ण केले आहे. सर्वत्र रंगीबेरंगी विद्युत रोषणाई केली असल्याने वडाळे तलाव विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. प्रवेशद्वारावर महापालिका, वडाळे तलावाचे चित्र असलेले विद्युत दिव्यांनी लखलखणारे फलक, आबालवृद्धांना बसण्यासाठी आसनव्यवस्था, विजेच्या खांबावर संगणकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने फुलपाखरांची आकर्षक चित्र यामुळे पनवेलचा सौंदर्यात भर पडली आहे. त्याबरोबरच आता तेथे नागरिकांना कानपिचक्या देणाऱ्या काही पुणेरी पाट्याही दिसू लागल्या आहेत.

'मासे त्यांच्या संसाराची आणि पोटापाण्याची काळजी घेतात, तुम्ही आपले वडाळे तलाव स्वच्छ ठेवण्याची काळजी घ्यावी. तुमच्या अरबट-चरबट खाण्याच्या सवयी माशांना लावू नका' अशा आशयाच्या पुणेरी पाट्या पनवेलमधील सुजाण नागरिकांना लावणे भाग पडले आहे.

तलावात उडणारे रंगीबेरंगी कारंजे, रंगीबेरंगी फोकसच्या प्रकाशात चमकणारे तलावाचे पाणी, तलावातल्या खडकावर चमकणारी स्वयंप्रकाशित हरणे, जॉगिंग ट्रॅकच्या बाजूने बसवलेले पिवळसर प्रकाश देणारे हेरीटेज लुक असणारे पथदिवे हे सगळे वडाळे तलावाच्या सौंदर्यात भर घालतात, पण या सौंदर्याला लोकांनी केलेला कचरा गालबोट लावत आहे. काही नागरिक हे तळ्यामधील माशांना खाद्यपदार्थ खायला घालतात. या नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने आता तिथे पुणेरी पाट्या आपल्या दिसत आहेत.

ऐतिहासिक बल्लाळेश्वर मंदिराच्या पायाशी असणाऱ्या वडाळे तलावाचे सौंदर्य निसर्गप्रेमींना नेहमीच खुणावत असते. तलावात उमलणारी कमळे, परदेशी पक्षी, निसर्गरम्य परिसर, तलावाशेजारचा वटवृक्ष हा आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. पनवेलचे भूषण असलेला वडाळे तलाव विस्तीर्ण, मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर महापालिकेने तलावाचे सुशोभीकरण करण्याचा निश्चय केला. या दृष्टीने महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सकारात्मक पावले उचलत तलावाचे सुशोभीकरण पूर्णत्वास नेले. सुशोभीकरणाअगोदर वडाळे तलावाचे एकूण क्षेत्रफळ ३० एकर



आहे. यापैकी २० एकरची जागा पाण्याखाली आहे. आज पनवेल महापालिकेच्या वतीने शहराच्या ऐतिहासिक वडाळे तलावाचे सुशोभीकरण करण्यात आल्याने दररोज सकाळी व संध्याकाळी वडाळे तलाव परिसरात पनवेलकरांसह परिसरातील नागरिकांची गर्दी पाहायला मिळत असून एक प्रकारे हा तलाव 'पिकनिक स्पॉट'च बनला आहे.

तलावावर फिरायला आलेले काही नागरिक शिळे अन्न, पाव, चपाती, बिस्किटे, बर्थडेचा उरलेल्या केक, पिझ्झाचे तुकडे, कुरमुरे असे बरेच अन्नपदार्थ तळ्यातील माशांना खायला घालत असल्याचे दिसून येते. तेथील सुरक्षा रक्षक व काही सुजाण नागरिक असे कृत्य करणाऱ्यांना हटकण्याचा प्रयत्न करतात, पण त्यांचा डोळा चुकवून काही बेशिस्त नागरिक नेहमीच असे कृत्य करतात. परिणामी तलावातील पाणी घाण होऊन माशांनादेखील हानी पोहचत आहे. याबाबत पर्यावरणप्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तसेच तलावाचे सौंदर्यीकरण टिकून राहावे या अनुषंगाने ज्यादा सुरक्षा रक्षक व कर्मचारी अथवा अधिकारी गर्दीच्या वेळेत गस्त घालण्यासाठी या ठिकाणी असावेत याकरिता पालिकेकडे पाठपुरावा सुरू आहे, परंतु प्राथमिक स्वरूपात याबाबत उपाययोजना करण्यासाठी काही पनवेलकर नागरिकांनी एकत्र येऊन डिझाईन्स व व्हॉट्सअॅप फ्लायर बनवले आहेत. त्यामध्ये पुणेरी पाट्यांच्या शैलीमध्ये कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय पोचवण्याचा प्रयत्न आहे.

> **नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सोशल मीडियावर ग्राफिक्स शेअर करून तसेच प्रत्यक्ष वडाळे तलाव परिसरात बॅनर्स लावले आहेत. एक पनवेलकर नागरिक म्हणून जे आम्ही करतोय ते प्रत्येकाने केले, तर या वडाळे तलावासोबतच संपूर्ण पनवेल शहर अधिक गतीने स्वच्छ होण्यास मदत होईल. पनवेल महापालिकेने उत्तम पद्धतीने वडाळे तलावाचे सौंदर्यीकरण केले आहे. हा तलाव आपल्या शहराचे लौकिक आहे. त्याचे जतन व संवर्धन करणे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. या भावनेतून तलावातील माशांना खाद्यपदार्थ खायला देऊ नये, जेणेकरून तलाव व परिसर स्वच्छ राहील.**
> **-अभिषेक पटवर्धन, पनवेलकर नागरिक**




# 'लोकराज्य'च्या विशेषांकांत कृषीविषयक माहिती

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात येत असलेल्या लोकराज्य मासिकाच्या एप्रिल-मे २०२३च्या कृषी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

या विशेषांकामध्ये कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय, सहकार व पणन, मृद व जलसंधारण आदी विभागांच्या वतीने राज्यात राबविण्यात येणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण योजनांचा आढावा घेण्यात आला आहे तसेच या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या यशकथांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे. याचबरोबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे विशेष लेख तसेच महत्त्वाच्या घडामोडी, 'मंत्रिमंडळात ठरले' या सदरांचाही समावेश या अंकात आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या https://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच https://mahasamvad.in/ या पोर्टलवर हा अंक वाचकांसाठी उपलब्ध आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅपने एडिट मेसेज फीचर केले लॉन्च




व्हॉट्सअॅप हे सध्याचे लोकप्रिय सोशल मीडिया अॅप आहे. मागील अनेक वर्षांपासून भारतासह जगभरातील लोक या अॅपचा दैनंदिन कामांमध्ये वापर करत आहेत. आपल्या यूजर्ससाठी मेटा कंपनी व्हॉट्सअॅपमध्ये नवनवीन अपडेट्स करीत असते. असेच एक नवीन फीचर व्हॉट्सअॅपने लॉन्च केले आहे. या फीचरमुळे यूजर्सना समोरच्या व्यक्तीला पाठवलेला मेसेज चॅटमधून १५ मिनिटांचा अवधी मिळणार आहे. याबाबतची माहिती काही महिन्यांपूर्वी समोर आली होती. नुकतंच या नव्या फीचरच्या लॉन्चची मेटा कंपनीने अधिकृत घोषणा करण्यात आली.

यूजर्सना आता चॅटवर आधीपेक्षा जास्त नियंत्रण ठेवता येईल. या फीचरमुळे मेसेजमधील शब्दांमध्ये दुरुस्ती करणे किंवा त्याला अधिकचा संदर्भ जोडणे शक्य होणार आहे. एडिट फीचरसाठी आम्ही फार उत्सुक आहोत. मेसेज पाठवल्यानंतर १५ मिनिटांच्या आत यूजर्सना मेसेजमध्ये बदल करता येणार आहे. मेसेज टॅप करून पुढे 'एडिट' पर्याय निवडल्यावर मेसेजमधील चुका सुधारता येणार आहेत, असे मेटा कंपनीने त्यांच्या ब्लॉगमध्ये नमूद केले आहे.

अनेकदा व्हॉट्सअॅप मेसेज पाठवल्यानंतर त्यात चुका असल्याचे आपल्या लक्षात येते. तेव्हा त्यात बदल करणे आवश्यक असते. अशा वेळी व्हॉट्सअॅप एडिट फीचर वापरता येईल. याबाबतची माहिती शेअर करताना मेटाचे प्रमुख मार्क झुकरबर्ग यांनी फेसबुक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी आता तुम्ही व्हॉट्सअॅपवर पाठवलेले मेसेज १५ मिनिटांपर्यंत एडिट करू शकता. हे एडिट फीचर लवकरच जगभरातील यूजर्सना वापरता येणार आहे असे म्हटले जात आहे. सध्या मोजक्या यूजर्सना या सेवाचा लाभ घेता येत आहे.

**व्हॉट्सअॅपवर पाठवलेले मेसेज एडिट करायच्या स्टेप्स**

- व्हॉट्सअॅप उघडा आणि चॅटवर जा.
- ज्या मेसेजमध्ये बदल करायचा आहे, तो मेसेज लॉन्ग प्रेस करा.
- मेसेज दाबून ठेवल्यावर काही सेकंदामध्ये एडिट मेसेज असा पर्याय दिसेल.
- तो पर्याय टॅप करून तुम्ही मेसेजमध्ये हवा तसा बदल करू शकाल.

# पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ

निमित्त



डॉ. माधव धनंजय गाडगीळ (जन्म : २४ मे १९४२, पुणे, महाराष्ट्र) हे जागतिक कीर्तीचे मराठी पर्यावरण शास्त्रज्ञ आहेत. त्यांचा जन्म व शालेय शिक्षण पुण्यात झाले. त्यांचे वडील धनंजयराव बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे आजीव सदस्य होते. सलीम अलींसारखे ख्यातनाम पक्षीतज्ज्ञ त्यांचे मित्र होते. जे.बी.एस. हाल्डेन हे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ गाडगीळांच्या वडिलांच्या परिचयाचे होते. त्यांचे घर पुण्यात जैवविविधता टिकवून ठेवलेल्या वेताळ टेकडीच्या परिसरात असल्याने भटकंती करणाऱ्या माधवरावांना जीवशास्त्र या विषयात रस निर्माण झाला. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी पदवी मिळवली. नंतर त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबई येथून सागरी जीवविज्ञानातील पदव्युत्तर पदवी मिळवली.

पीएचडीच्या अभ्यासासाठी पुढे अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात ते गेले. जीवशास्त्र विषयात गणितीय प्रतिमानांचा आधार असणारा प्रबंध सादर करणारे माधवराव हार्वर्डमधील पहिलेच विद्यार्थी होते. त्यांच्या या कामाचा संदर्भ पुढे अनेक संशोधक दीर्घकाळ देत राहिले. गाडगीळांना विल्यम बॉसर्ट यांच्या मार्गदर्शनाखाली माशांच्या वर्तनाबद्दल जीवविज्ञानातील पीएचडी मिळाली. त्यांच्या संशोधनासाठी हार्वर्ड कम्प्युटिंग सेंटरने आयबीएम शिष्यवृत्ती त्यांना दिली होती.

हार्वर्ड विद्यापीठात उपयोजित गणित संशोधन अभिछात्र पदावर त्यांनी कारकीर्दीची सुरुवात केली. नंतर त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात जीवशास्त्र व्याख्याता, स्टॅनफर्ड विद्यापीठात मानवी जीवशास्त्राचे अतिथी प्राध्यापक व्याख्याता, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कलीत सन्माननीय भारतीय अमेरिकन व्याख्याता अशी पदे भूषविली.

पुढे माधव गाडगीळ भारतात परतले. त्यांनी पुण्यात दोन वर्षे महाराष्ट्र असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्समध्ये (आता आघारकर संशोधन संस्था) वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम पाहिले.

भारताबाहेरील प्रतिष्ठित विद्यापीठांत अतिथी प्राध्यापक, व्याख्याता इत्यादी पदांवर संलग्न असताना १९७३ ते २००४ दरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू हे त्यांनी आपल्या कामाचे केंद्र ठेवले. तेथे आधी सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, नंतर प्राध्यापक आणि शेवटी त्यांनी तेथेच सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस ही संस्था स्थापन केली व तिचे ते अध्यक्ष होते. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे देशभरातील संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, धोरणकर्ते, शेतकरी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि अधिकारी एकत्र येऊन काम करत. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही संस्थेने जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन उपक्रमांत जोडून घेतले. गाडगीळांच्या प्रभावामुळे संस्थेच्या पर्यावरण विषयक सर्व प्रकल्पांत प्राण्यांचे वर्तनदेखील सातत्याने अचूक आकडेवारीत नोंदण्याचे धोरण ठेवले गेले. विज्ञानात अशा संख्यात्मक नोंदींचे विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरते. माणूस हादेखील जैवविविधतेतील एकात्म पर्यावरणीय घटक आहे. तो पर्यावरणातून वगळून चालणार नाही, अशी विचारसरणी गाडगीळांनी ठेवल्यामुळे जैवविविधता संरक्षण, संवर्धनात स्थानिक लोकांच्या विरोधाची धार बोथट झाली.

गाडगीळ केंद्र शासनाच्या स्वतंत्र पर्यावरण विभाग स्थापन करण्यासाठीच्या समितीचे सदस्य होते. त्यांनी त्याचा आराखडा बनवून स्वतंत्र पर्यावरण विभाग साकारला. १९८६ ते १९९० या काळात ते भारताच्या पंतप्रधानांच्या विज्ञान तंत्रज्ञान सल्लागार मंडळाचे सदस्य राहिले. जैवविविधता परिषदेच्या सल्लागार समितीचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. पंतप्रधानांच्या पुढाकाराने वाघांचे संरक्षण, व संवर्धन करण्याच्या हेतूने स्थापलेल्या विशेष कार्यगटाच्या पाच निष्णात सदस्यांपैकी ते एक होते. त्यांचे समाजोपयोगी संशोधन, मार्गदर्शन विज्ञानप्रसाराचे कार्य अथकपणे सुरू आहे.

**(साभार : विकिपिडीया)**

## क्लिक...क्लिक...!



**खालापूर : दुर्गम भागातील आदिवासी वाड्यांना पाणीटंचाईच्या तीव्र झळा बसत आहेत. तेथील महिलांना हंडाभर पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.** (छायाचित्र : जयवंत माडपे)

## आरोग्य प्रहर

# बडीशेपचे पाणी आरोग्यासाठी उपयुक्त

हल्ली सर्वांचीच जीवनशैली खूप धावपळीची आणि व्यस्त झालीय. त्यामुळे वेळेवर जेवण, झोप आणि व्यायाम या गोष्टी सर्वांनाच करता येतात असे नाही. त्यांच्या अभावामुळे लोकांना अनेक आजारांचा सामना करावा, मात्र काही लोकांच्या आजारांचे मूळ कारण त्यांचे वाढलेले वजन असते. वाढलेले वजन माणसाला अनेक प्रकारे हानी पोहचवते. मग वजन कमी करण्यासाठी लोक अनेक मार्गांनी प्रयत्न करतात. अशा वेळी बडीशेपच्या पाण्याचे सेवन करून वजन कमी करता येऊ शकते.



बडीशेप प्रत्येकाच्या घरी असतेच. सहसा लोकांना जेवणानंतर बडीशेप खाण्याची सवय असते. बडीशेपचे खाण्याचे अनेक फायदे आहेत. सकाळी रिकाम्यापोटी बडीशेपचे पाणी प्यायल्यास वजन कमी होऊ शकते. रिकाम्या पोटी सेवन केल्यास डिटोक्स होण्यास मदत मिळते. याशिवाय यात फायबर भरपूर असल्याने पचनसंस्था सुरळीत राहते. रिकाम्या पोटी एका बडीशेपच्या पाण्याचे सेवन केले तर ते वजन कमी करण्यास मदत करते, शिवाय यामुळे लठ्ठपणादेखील नियंत्रित ठेवता येऊ शकतो. शरीर डिटॉक्स करायचे असेल तर एका बडीशेपचे पाणी रिकाम्या पोटी प्यावे. ज्यांना वजन कमी करायचे आहे त्यांच्यासाठी बडीशेपचे पाणी खूप उपयुक्त आहे.

**असे बनवा बडीशेपचे पाणी**

बडीशेपचे पाणी बनवण्यासाठी १ टेबलस्पून बडीशेप २ लिटर पाण्यात रात्रभर भिजत ठेवा. आता सकाळी उकळून घ्या. नंतर गाळून कोमट प्या.

**डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते**

बडीशेपचे पाणी डोळ्यांचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करते. बडीशेपमध्ये व्हिटॅमिन ए आढळते, ज्यामुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते तसेच डोळ्यांवरील सूज किंवा जळजळ कमी होते.

**उच्च रक्तदाब नियंत्रणात राहतो**

बडीशेपच्या पाण्यात पोटॅशियमचे प्रमाण अधिक असते. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो तसेच हृदयासंबंधित अनेक आजार दूर ठेवते.

**कर्करोगावरही फायदेशीर**

बडीशेपच्या पाण्यामध्ये अँटी ऑक्सिडेंट असतात. ज्यामुळे शरीराला कर्करोगासारख्या गंभीर आजारांविरुद्ध लढा देण्याची क्षमता मिळते. बडीशेपचे पाणी स्तनाचा कर्करोग, फुफ्फुसाचा कर्करोग किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कर्करोगावरदेखील फायदेशीर आहे, परंतु ते घेण्यापूर्वी डॉक्टर सल्ला घ्या.

# सुक्या मासळीचे दर वाढले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळा काही दिवसांवर आला असून दोन महिने खोल समुद्रातील मासेमारी बंद राहणार आहे. त्यामुळे हंगामाचा शेवट चांगला करण्यासाठी मच्छीमार सरसावले आहेत, मात्र पकडलेली मासळी बाजारात न विकता, सुकवून ठेवण्याकडे मच्छीमारांचा कल वाढत आहे. पावसाळ्यासाठी अनेक गृहिणींकडून साठा करून ठेवण्यात येत असल्याने सुक्या मासळीला मागणी वाढली आहे, त्याबरोबर दरही गगनाला भिडले आहेत.

कोळीवाड्यात मासळी सुकवण्याचे काम सध्या जोमाने सुरू आहे. सध्या कडक उन्हाळा सुरू असल्यामुळे रस्त्यांवर बोंबील, जवळा, मांदेली, कोळंबी, बांगडा, माकूल आणि आंबाड या मासे सुकवण्यासाठी ठेवले आहेत. वातावरणातील बदलांमुळे खोल समुद्रातील मासेमारीवरही परिणाम झाल्याने मच्छीमारांनी मासळी सुकवण्यास प्राधान्य दिले आहे.



## ग्राहकांच्या खिशाला कात्री

राज्यभरातून सुक्या मासळीला मागणी असते. रायगडमधील आक्षी, वरसोली, जीवनाबंदर, राजपुरी कोळीवाड्यातून दररोज काही टनांमध्ये सुकी मासळी राज्यातील इतर भागात पाठवली जाते.

### मागणी वाढल्याने तुटवडा

रायगडमधील सुक्या मासळीसाठी सर्वांत मोठी बाजारपेठ मुंबई आहे. त्यानंतर पुणे, नाशिक, सातारा यांसह मराठवाड्यात सुकी मासळी पाठवली जाते. सध्या तिथल्या बाजारपेठांमध्ये सुक्या मासळीला भाव वाढल्याने जास्तीत जास्त साठा नेण्याचा प्रयत्न व्यापाऱ्यांचा आहे. स्थानिक बाजारपेठांमध्ये सुक्या मासळीचा तुटवडा जाणवू लागल्याने दर वाढले आहेत. यात बोंबील, वाकटी, आंबाड, सोडे, ढोमी, बांगडा, सुकट आदींचा यामध्ये समावेश आहे.

त्यामुळे स्थानिक बाजारात सुक्या मासळीचे दर वाढले आहेत. वाढलेल्या किमतीमुळे ग्राहकांच्या खिशाला कात्री लागत आहे.

# खालापूर समस्यांनी ग्रासलेले
## वास्तव्यासाठी नावडते ठिकाण

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यामध्ये खालापूर तालुक्यात नागरी सोयीसुविधांची वानवा असल्याने या ठिकाणी नागरिक वास्तव्यासाठी पाठ फिरवू लागले आहेत.

खालापूर तालुक्यात केवळ दहावी येते पर्यंत शिक्षणाची सोय आहे. शिवाय तालुक्याचे ठिकाण असून देखील परिवहन सेवेची बोंब आहे. मुंबई पुणे महामार्गावरून धावणाऱ्या जलद गाड्या तालुका ठिकाण असूनदेखील थांबत नाहीत. याशिवाय वीजपुरवठा खेळखंडोबा, पिण्याच्या पाण्याची समस्या खालापूरकरांच्या पाचवीला पुजलेली आहे. खालापूर शासकीय कार्यालयात नोकरीसाठी आग्रही असलेले अधिकारी जर खालापूर शहरात राहिले तर खालापुरातील अनेक समस्या मार्गी लागतील, अशी भाबडी आशा खालापूर नागरिकांना आहे.

खालापूर शहरातील समस्या सुटण्यासाठी या ठिकाणी अधिकारी वर्ग राहिला तर त्यांना समस्येची झळ बसेल. जेणेकरून खालापूर नागरिकांना सोसाव्या लागणाऱ्या यातनांची जाणीव होईल. शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांसाठीदेखील बायोमेट्रिक हजेरी आवश्यक आहे. जेणेकरून अधिकारी किती वाजता कार्यालयात येतात आणि किती वाजेपर्यंत थांबतात हेदेखील माहिती पडेल, असे खालापूर येथील रहिवासी दीपक जगताप यांनी सांगितले.

# रायगडात पाणीटंचाईच्या झळा

**अलिबाग :** तापमान वाढीमुळे अनेक जलसाठे आटले आहेत. रायगड जिल्ह्याच्या बऱ्याच ग्रामीण भागात पाणीटंचाई जाणवत आहे.

प्रशासनाकडूनही पाणीटंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वच ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027264** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/Re-e-Tender-29/2023-2024. RFx Re-e-tender for Supply of Silica Gel, Cotton Cloth, Petroleum Jelly and Polythene Paper at various Substations under EHV O&M Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 4,80,461/- **EMD Amount:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 22.05.2023, 18:00 Hrs to 29.05.2023, 10:00 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 29.05.2023 up to 10:00 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 29.05.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel


# ज्येष्ठ नागरिकाचे पैसे लंपास

**पाली : प्रतिनिधी**

बँक ऑफ इंडिया पाली शाखेतून नुकतेच जेष्ठ नागरिक मनोहर देशमुख यांच्याकडील साडेतेरा हजार रुपये चोरट्यांनी भर बँकेतून लंपास केले आहेत. ही घटना बँकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.



सध्या फसवणूक व गुन्हेगारी प्रकरणात मोठी वाढ झाली आहे, याचेच शिकार देशमुख झाले आहेत.

मनोहर देशमुख यांनी पाली बँक ऑफ इंडिया बँकेतून ४५ हजार रुपये काढले. आणि ते तेथेच पैसे मोजत उभे होते. अशावेळी त्यांच्या शेजारी एक टोपी घातलेला माणूस उभा राहिला. त्याने बोलण्यात गुंतवून ठेवले व पैसे मोजण्याच्या बहाण्याने ४५ हजार रुपयांच्या बंडल मधून साडेतेरा हजार रुपये सराईतपणे काढून तेथून पोबारा केला. त्याच्या साथीदारानेदेखील मनोहर देशमुख यांना बोलण्यात गुंतविले आणि साथीदार बँकेबाहेर गेल्यावर त्यानेही तेथून पोबारा केला. ही बाब लागलीच लक्षात आल्यावर मनोहर देशमुख यांनी पाली पोलीस ठाण्याला तक्रार दिली. त्यांनी बँकेतून सीसीटीव्ही फुटेज मागून तपासाला सुरुवात केली.

# शाळेच्या आठवणीत रमले माजी विद्यार्थी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड सर.एस.ए.हायस्कुलच्या एस.एस.सी.१९७२ वर्षांच्या बॅचचे विद्यार्थी ५१ वर्षांनी शहरात एकत्र येऊन पुन्हा एक दिवस हायस्कूलचा अनुभवाला. अगदी शाळेच्या प्रार्थनेपासुन ते थेट वर्गातील धुमशानापर्यतच्या सर्व आठवणी काढुन सर्वांनी आपले बालपण पुन्हा एकदा अनुभवले.

या वेळी डॉ. राज कल्याणी, रोहिदास दुसार, प्रफुल्ल कदम, तारा डबरी, सुबोध साने, विलास जोशी, श्रीकृष्ण सुभेदार, गजानन तरे, गजानन पाटील, गिरीष कर्णिक, मालती साखरकर, मोहन मिठाग्री, उषा चौलकर, माणिक विरुकुड, अलका रणदिवे आदिसह एस.एस.सी.१९७२ चे २५ विद्यार्थ्यां उपस्थित होते.

बॅचचे विद्यार्थी डॉक्टर-राज कल्याणी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की आपण कितीही मोठे झालो. वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी झालो तरी शालेय जीवनातील मौज काही वेगळी असते. आपली शाळा आणि शाळेतील ते सोनेरी दिवस कोणी विसरू शकत नाही, पण काळ कधी थांबत नाही. सरलेले दिवस पुन्हा येत नाहीत. तरीही सर एस.ए. हायस्कूलच्या १९७२च्या आकरावीच्या बॅचने शाळेतील त्या आठवणी तब्बल ५१ वर्षांनी पुन्हा जागवल्या 'एक दिवस हायस्कूलचा' या उपक्रमाद्वारे सहा महिन्यापूर्वी या बॅचच्या काही मित्र-मैत्रिणींचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला. अनेक मित्र-मैत्रिणी हळूहळू या ग्रुपमध्ये सहभागी होत गेले आणि 'गेट टुगेदर'ची संकल्पना पुढे आली.




## नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/2029B2015 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 C 2174 चे मालक **श्री. अशोक गजानन फके** यांचे तारीख २२/०२/२०२३ रोजी निधन झाले.

मी **श्रीमती अरुणा अशोक फके**, पत्ता- मु. कामोठे, सेक्टर १४, ता. पनवेल, जि. रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - श्रीमती अरुणा अशोक फके,**
**पत्ता- मु. कामोठे, सेक्टर १४, ता. पनवेल, जि. रायगड**


# रोव्हर मशीनद्वारे मोजणी प्रात्यक्षिक कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

भूमी अभिलेख विभागात अचूक व जलद गतीने मोजणी करण्यासाठी रोव्हर मशीन पुरविण्यात आल्या आहेत. जिल्ह्यामध्ये पुरविण्यात आलेल्या रोव्हर मशीनद्वारे मोजणीचे प्रात्यक्षिक जिल्हाधिकारी रायगड डॉ. योगेश म्हसे यांना शनिवारी (दि. २०) अलिबाग तहसीलदार कार्यालयाच्या आवारात दाखविण्यात आले.

या वेळी अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील व उप अधीक्षक भूमी अभिलेख भोला कोकणे तसेच भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या मशीनमुळे भूसंपादन मोजणी, नागरिकांच्या अर्जावरील मोजणी, शासकीय मोजणी आणि इतर मोजणी कामे जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी रायगड जिल्ह्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे जलद गतीने निकाली करण्यासाठी रोव्हर मोजणी मशीनचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

# मुरुडमध्ये आज शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवारी (दि. २४) सकाळी १०.३० वाजता अहिल्यादेवी होळकर स्त्रीशक्ती समस्या समाधान शिबिराचे आयोजन मुरूडच्या दरबार हॉल पंचायत समिती येथे करण्यात आले आहे. सर्व शासकीय विभागाचे स्टॉल्स येथे असणार असल्याचे मुरूडचे तहसीलदार रोहन शिंदे यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत सांगितले.

शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहून शासनाच्या सर्व योजनांची माहिती देणार आहेत. महिलांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे असणाऱ्या तक्रारींचे निरसन करण्यात येणार आहे. मुरूड तालुक्यातील सर्व महिलांनी आपल्या असणाऱ्या तक्रारींचे अर्ज भरून त्या त्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे ३१ मे २०२३ रोजी प्रत्येक ग्रामपंचायत शेत्रातील दोन कर्तबगार महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.


**उरण नगरपरिषद**
**जाहीर प्रकटन**

जा.क्र. उनप/बांवि/३९४/सन २०२३-२०२४
उरण नगरपरिषद
उरण, जिल्हा रायगड
दिनांक - २३-५-२०२३

उरण नगरपरिषद हद्दीमधील सर्व रहिवाशी मिळकतधारकांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यांत येते की, चालू पावसाळी मोसमामध्ये संभाव्य अतिवृष्टी, वादळ, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी ज्या मिळकती/इमारती धोकादायक झाल्या आहेत अथवा त्या इमारतीमधील/मिळकतीमधील कांही भाग धोकादायक झाला आहे अशा इमारतींमध्ये किंवा मिळकतीमध्ये कोणीही वास्तव्य करु नये. तसेच अशा इमारतीच्या व मिळकतीच्या संबंधीत घरमालकांनी/भोगवटाधारकांनी आपल्या कुटूंबियाची तसेच शेजारच्या रहिवाश्यांची संभाव्य जिवीत व वित्त हानी होऊ नये या दृष्टीने धोकादायक इमारतीच्या व मिळकतीचा धोकादायक भाग तांतडीने उतरवून घेऊन धोका नष्ट करावा. अशा धोकादायक इमारती/मिळकतीं संदर्भात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये ही नोटीस समजण्यांत यावी अशा धोकादायक इमारतींमध्ये / मिळकतींमध्ये जर कोणी वास्तव्य केले, तसेच त्यामुळे कोणत्याही प्रकारची जिवीत व वित्त हानी झाली तर नगरपरिषद त्यास जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(राहुल इंगळे)
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल - ४१०२०६
**जाहीर प्रकटन**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व रहिवासी मिळकत धारकांना या जाहीर प्रकटनद्वारे कळविण्यात येते की, जिवीत व वित्तीयहानी टाळण्यासाठी ज्या मिळकत, इमारती धोकादायक झाल्या आहेत अथवा त्यांचा काही भाग धोकादायक झाला आहे, अशा इमारतीमध्ये किंवा मिळकतीमध्ये कोणतेही वास्तव करु नये.

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ मध्ये नमुद केल्यानुसार ज्या इमारतींना ३० वर्ष पुर्ण झाली आहेत व ज्या आर्थी इमारतीचा प्रत्येक भाग आणि तदंगभूत प्रत्येक वस्तू तिच्यापासून धोका निर्माण होणार नाही अशा रीतीने दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवणे हे प्रत्येक इमारतीच्या मालकाचे आवश्यक कर्तव्य आहे.

ज्या अर्थी पनवेल महानगरपालिकेतील सर्व मिळकतधारक यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६५ अन्वये इमारतीचे मालक, भोगवटादारांनी सदर इमारतीचे नोंदणीकृत बांधकाम अभियंता (Structural Engineer) यांच्या कडुन तपासणी (Structural Audit) करुन आवश्यकता असल्यास त्यांच्या देखरेखेखाली इमारतीची दुरुस्ती करुन बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी पनवेल महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांनी स्ट्रक्चर ऑडिट रिपोर्ट सादर केला आहे. परंतु, ३३ मिळकतधारकांनी आजपावेतो सदरची धोकादायक इमारती/बांधकामे रिकामी केलेली नसल्याने, पावसाळ्यामध्ये धोकादायक इमारती पडून हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणेत आलेली आहे.

त्या अर्थी संबंधितांनी अशा धोकादायक इमारती/बांधकामे तात्काळ रिकामी करुन अशी बांधकामे तात्काळ पाडून/उतरवून घ्यावीत अन्यथा अशा धोकादायक इमारती पडुन कोणत्याही प्रकारची जिवित वा वित्तीयहानी झाल्यास त्यास संबंधित घरमालक/भोगवटादार हे जबाबदार राहतील या बाबतीत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

पमपा/अ.बां.नि./२४२३/
जा.क्र ३९/२०२३
दिनांक : २३/०५/२०२३

सही/-
(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी,**
**ता. खालापूर, जि. रायगड**

जा.क्र. ३८६ दिनांक : २३/०५/२०२३

**निविदा**

वरील उपरोक्त विषयान्वये आपणास विनंतीपुर्वक कळविण्यात येत आहे की, ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी मधुन खालील कामे सन २०२३/२०२४ या आर्थीक वर्षाकरीता ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकासकामे करणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर खाली दीलेल्या निविदा सूचना प्रसिध्द केल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी सदर निविदांच्या तपशिलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या निविदा सूचना/जाहिराती पहाव्यात व विहीत मुदतीत आपल्या निविदा ऑनलाईन सादर कराव्यात.

| अ.क्र. | कामाचे नांव | निधी | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १. | ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी हद्दीतील CCTV दुरुस्त व साहीत्य पुरवठा करणे. | ग्रामनिधी | १२ महिने |
| २. | ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी हद्दीतील CCTV वार्षिक सर्वीस सेवा पुरविणे. (A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| ३ | ग्रामपंचायतीमध्ये वार्षिक पुरवठा करणे. १. टी.सी.एल २. मेडीक्लोर ३. कार्बोलिक पावडर, ४. सॅनेटायजर ५. गारबेज पावडर ६. चुना ७. मास्क ८. बायोकल्चर पावडर | ग्रामनिधी | १२ महिने |
| ४. | ग्रामपंचायतीचे संगणक साहीत्य, प्रिंटर साहीत्य व टोनर, कलर शाई साहीत्य व सर्वीस पुरविणे. (A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| ५. | ग्रामपंचायतीचे संगणक, प्रिंटर, लॅपटॉप पुरविणे. | ग्रामनिधी | १२ महिने |
| ६. | वार्षिक दिवाबत्ती व इतर साहीत्य पुरविणे. | ग्रामनिधी | १२ महिने |
| ७. | वार्षिक प्लंबिग व पाणीपुरवठा विषयक साहीत्य व इतर साहीत्य पुरविणे. | ग्रामनिधी | १२ महिने |
| ८. | १. ATM. फील्टर डोणवत बौध्दवाडी/आदीवासीवाडी, डोणवत ठाकुरवाडी, तांबाटी ठाकुरवाडी येथिल फील्टर दुरुस्त करुन वार्षिक सर्वीस पुरविणे. (A.M.C.) २. डोणवत, गोरठण खुर्द, तांबाटी, खिरकींडीवाडी येथिल सँन्ड फील्टर दुरुस्त करुन सर्वीस देणे.(A.M.C.) ३. डोणवत येथे हनुमान मंदीराजवळ फील्टर दुरुस्त व सर्वीसिंग करणे.(A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| ९. | ग्रामपंचायत हद्दीत वार्षिक धुर फवारणी व सॅनेटायजर फवारणी औषधांसहीत करणे.(A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| १०. | ग्रामपंचायत हद्दीत वार्षिक उघड्या व बंदीस्त गटारावर फवारणी औषधांसहीत करणे.(A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| ११. | ग्रामपंचायत हद्दीत वार्षिक पिण्याच्या पाण्याच्या टाक्या औषध टाकुन व्हॅक्युम क्लिनरने साफसफाई करणे. (A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| १२. | ग्रामपंचायत हद्दीत वार्षिक स्ट्रीट लाईट साहीत्य दुरुस्त करणे. | ग्रामनिधी | १२ महिने |
| १३. | ग्रामपंचायत हद्दीत वार्षिक बॅनर, फ्लेक्स, ॲक्रलिक पाटी पुरविणे. (A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |
| १४. | ग्रामपंचायत हद्दीत वार्षिक हद्दीतील नळ पाणीपुरवठा योजनेचे मोटारपंप दुरुस्त करणे. ५ एच.पी.- संख्या-६ ७.५ एच.पी.- संख्या-३ १० एच.पी.- संख्या-२ डोणवत ठाकुरवाडी, तांबाटी ठाकुरवाडी, डोणवत बौध्दवाडी A.T.M. पंप दुरुस्त करुन वार्षिक सर्वीसिंग करणे. संख्या- ३ डोणवत सभागृहाजवळील फील्टर -१ (A.M.C.) | ग्रामनिधी | १२ महिने |

(सही)
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी

(सही)
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी

**सिडको** शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादीत जागेच्या बदल्यात भूखंड- २२, सेक्टर-०४, क्षेत्र -३४३०.०० हा भूखंड **१) श्री. नामदेव महादेव तारेकर २) श्री. ज्ञानेश्वर महादेव तारेकर ३) श्रीमती गंगाबाई ऊर्फ गंगुबाई सुधाकर म्हात्रे ४) श्रीमती सिताबाई सखाराम भोईर ५) श्रीमती पार्वती अनंत तारेकर ६) श्रीमती ममता हेमंत डाकी ७) श्रीमती मेघना अनंता तारेकर ८) श्रीमती सुमन अनंता तारेकर ९) श्रीमती अश्विनी अनंता तारेकर १०) श्री. राहूल अनंता तारेकर** यांना वाटप करण्यात आला असून हक्कसोड पत्राद्वारे सदरचा भूखंड **१) श्रीमती अश्विनी अनंता तारेकर २) श्री. ज्ञानेश्वर महादेव तारेकर ३) श्री. नामदेव महादेव तारेकर ४) श्रीमती पार्वती अनंत तारेकर ५) श्रीमती मेघना अनंता तारेकर ६) श्रीमती ममता हेमंत डाकी ७) श्री. राहूल अनंता तारेकर ८) श्रीमती सुमन अनंता तारेकर ९) श्रीमती सिताबाई सखाराम भोईर** यांचे नावे नोंद करण्यासाठी विना मोबदला हक्कसोड पत्र नोंदणी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल५-१०८३२- २०२२ हे सह दुय्यम निबंधक, पनवेल-५, पावती क्र.११६९८ यांचेकडे दिनांक-२९/०६/२०२२ रोजी नोंदणीकृत केले आहे.

| अ. क्र. | युनिट/ निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | भूधारकांचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पारगांव- डुंगी १८८ | १७/४/११ ३/४ ३५/१५ ३६/१ ६/७ | ०-६१-१ ०-२२-२ ०-५२-८ ०-३३-९ ०-२१-७ हे. आर. | १) श्री. नामदेव महादेव तारेकर २) श्री. ज्ञानेश्वर महादेव तारेकर ३) श्रीमती गंगाबाई ऊर्फ गंगुबाई सुधाकर म्हात्रे ४) श्रीमती सिताबाई सखाराम भोईर ५) श्रीमती पार्वती अनंत तारेकर ६) श्रीमती ममता हेमंत डाकी ७) श्रीमती मेघना अनंता तारेकर ८) श्रीमती सुमन अनंता तारेकर ९) श्रीमती अश्विनी अनंता तारेकर १०) श्री. राहूल अनंता तारेकर | ३४३०.०० चौ. मी. | भूखंड क्र.२२, से.०४ क्षेत्र- ३४३०.०० चौमी या भूखंडाचे वाटप दिनांक २०/११/२०१५ रोजी करण्यात करण्यात आले असून भाडेपट्टा करारनामा दि. २४/०५/२०२२ रोजी झालेला आहे. |
| | पारगांव १३४ | १५/१ | ०-२६-० हे. आर. | | | |

संगणकीय सोडतीमध्ये भूखंड क्र. २२, सेक्टर-०४, क्षेत्र - ३४३०.०० चौमी हा भुखंड पुष्पकनगर दापोली येथे वाटपित करण्यात आलेला आहे. करारनामा दिनांक २४/०५/२०२२ रोजी निष्पादीत करण्यात आला आहे. खालील तक्त्यामध्ये हक्क सोडणारे व हक्क प्रदान करणारे नमुद करण्यात आले आहेत :

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १) श्रीमती गंगाबाई ऊर्फ गंगुबाई सुधाकर म्हात्रे | १) श्रीमती अश्विनी अनंता तारेकर २) श्री. ज्ञानेश्वर महादेव तारेकर ३) श्री. नामदेव महादेव तारेकर ४) श्रीमती पार्वती अनंत तारेकर ५) श्रीमती मेघना अनंता तारेकर ६) श्रीमती ममता हेमंत डाकी ७) श्री. राहूल अनंता तारेकर ८) श्रीमती सुमन अनंता तारेकर ९) श्रीमती सिताबाई सखाराम भोईर |

उपरोक्त दाव्यामधील हक्कसोड प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर सिडको दप्तरी केवळ **१) श्रीमती अश्विनी अनंता तारेकर २) श्री. ज्ञानेश्वर महादेव तारेकर ३) श्री. नामदेव महादेव तारेकर ४) श्रीमती पार्वती अनंत तारेकर ५) श्रीमती मेघना अनंता तारेकर ६) श्रीमती ममता हेमंत डाकी ७) श्री. राहूल अनंता तारेकर ८) श्रीमती सुमन अनंता तारेकर ९) श्रीमती सिताबाई सखाराम भोईर** यांचेच नावांची भाडेपट्टेदार म्हणून नोंद घेण्यात येईल.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेवून जे भूखंडधारक आहेत ज्यांचे भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्यांची/त्यांचे नावे वगळून जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून नोंद घेण्यात येईल. आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) विभाग, तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर नवी मुंबई- ४००६१४, यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१०८/२०२३-२४

# नवी मुंबईत डेंग्यू निर्मूलन उपक्रम

## पालिकेचा आरोग्य विभाग सज्ज

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळा आली की शहरात संभाव्य डेंगीचे रुग्ण वाढण्याची भीती असते. याच अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागाने डेंगीविरोधात विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात प्रत्यक्ष घरभेटी देऊन संशयित रुग्णांचे रक्ताचे नमुने तपासणीबरोबर शिबिरांतून जनजागृती केली जात आहे.

डेंग्यूविषयक जनजागृती व्हावी, यादृष्टीने महापालिकेने व्यापक जनजागृतीवर भर दिला आहे. यामध्ये बॅनर्स, पोस्टर्स, हस्तपत्रकेही वितरित करून जनजागृतीवर भर दिला जात आहे. तसेच आगामी पावसाळाचा कालावधी लक्षात घेता प्रतिबंधात्मक म्हणून घरांतर्गत डासोत्पत्ती स्थाने तपासणीची विशेष मोहीम संपूर्ण महापालिका क्षेत्रात राबवली जाणार आहे. तसेच एडिस डासांची मादी चावल्यामुळे डेंगी होत असल्याने याबाबत जनजागृती करण्यासोबतच डासोत्पत्ती स्थाने शोधकार्यही सुरु करण्यात आले असून पालिकेने आत्तापर्यंत ४५२ डासउत्पत्ती स्थाने शोधून काढली आहेत.



### पावसाळ्यात ही काळजी घ्या!

- घर, कार्यालय परिसरात पाणी साचू देऊ नये.
- गच्चीवरील व घरांतर्गत लॉफ्ट टँक, सोसायटीमधील सर्व पाण्याच्या टाक्या बंदिस्त करावे.
- गच्चीवर अथवा घराच्या परिसरात भंगार साहित्य, रिकाम्या बाटल्या, करवंट्या नष्ट करावे.
- फुलदाण्या, कुंड्यांखालील ट्रे, फेंगशुई यामध्ये साचलेले पाणी किमान आठवड्यातून एकदा बदलावे.
- पाणी साठवण्याचे ड्रम, टाक्या, भांडी पूर्णपणे कोरडे करावेत.
- कुंड्यांखाली असलेले ट्रे, फ्रिज डिस्फ्रॉस्ट ट्रे तसेच एसी डक्ट काढावे.

### दोन लाख घरांची पडताळणी

**शोध मोहिमेअंतर्गत १५ एप्रिल पासून २१०८६७ घरांना भेटी दिलेल्या असून ४१३८८८ डासोत्पत्ती स्थाने तपासलेली आहेत. त्यामध्ये ३० स्थानांवर एनॉफिलीस, ४५२ स्थानांवर एडिस व १४ स्थानांवर क्युलेक्स डासांची उत्पत्ती स्थाने आढळलेली आहेत. ही ४९५ डास उत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात आलेली आहेत.**

# वाचन संस्कृतीला पालिकेचे प्रोत्साहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेले ग्रंथालय तसेच अभ्यासिका आत्ता आणखी सक्षम होणार आहेत. कारण महापालिकेच्या वतीने या ग्रंथालयात आता नवीन पुस्तकांची भर पडणार असून शहरातील १९ ग्रंथालये आणि अभ्यासिकांसाठी साडेचार लाखांहून अधिक किमतीची पुस्तके खरेदीसाठी महापालिकेने निविदा मागवली आहे.

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिका स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. यासाठी शहरात ११ ग्रंथालये तसेच आठ अभ्यासिका उभारण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, झोपडपट्टी तिथे ग्रंथालय या संकल्पनेतून झोपडपट्टी परिसरातही वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचबरोबर शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सानपाडा येथे महापालिकेने सेंट्रल लायब्ररी उभारण्याचा निर्णय घेतला असून शहरातील १९ ग्रंथालये तसेच अभ्यासिकांमध्ये पालिकेच्या वतीने ४ लाख ६४ हजार ३७ इतक्या किमतीची पुस्तके खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या ग्रंथ खरेदीसाठी यापूर्वीदेखील पालिकेने निविदा मागवली होती. मात्र, योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याने पालिकेने आता दुसऱ्यांदा फेरनिविदा काढली आहे. त्यामुळे आधी असलेल्या पुस्तकांच्या संख्येत आत्ता अधिक वाढ होणार आहे. त्यामुळे वाचकांनाही अनेक पर्याय उपलब्ध होणार असून या माध्यमातून समृद्ध वाचक निर्माण होतील, असा विश्वास पालिकेला आहे.



**शहरातील १९ ग्रंथालयात मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्याभरात वाचकांकरिता नवीन पुस्तके उपलब्ध होणार आहेत. तसेच सानपाडा येथील सेंट्रल लायबरीचे भूमिपूजन लवकरच होणार आहे.**

**–राजेश नार्वेकर, आयुक्त, महापालिका**

### सुविधेसाठी नाममात्र शुल्क

**पालिकेच्या वतीने उभारण्यात आलेली ही ग्रंथालये सकाळी दहा ते संध्याकाळी सहापर्यंत सर्वांसाठी खुली असतात. मासिक वीस रुपये इतके नाममात्र शुल्क आकारून या ग्रंथालयाचे सभासदत्व घेता येते. त्यामुळे या ग्रंथालयांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. या ठिकाणी महत्त्वाची सर्वच पुस्तके उपलब्ध असल्यामुळे पुस्तकप्रेमी आवर्जून हजेरी लावत आहे.**

## निवडक

### शिरवणे येथे जुगाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई :** शिरवणे येथे उघड्या जागेत जुगार खेळणाऱ्यांवर छापा टाकून कारवाई करण्यात आली आहे. शिरवणे सेक्टर १ येथे रात्रीच्या वेळी गल्लीत उघड्यावर बसून जुगार खेळला जात होता. याची माहिती मिळताच नेरूळ पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला. त्यामध्ये पाच जण जुगार खेळताना आढळून आले. तर त्यांचे साथीदार अंधारात पळून गेले. त्यांच्यावर नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

### मुक्ता बर्वेकडून भावे नाट्यगृहाचे कौतुक

**नवी मुंबई :** अभिनेत्री मुक्ता बर्वे यांनी इन्स्टाग्राम पोस्ट करीत वाशी नवी मुंबईतील विष्णुदास भावे नाट्यगृहास अप्रतिम नाट्यगृह म्हणत नवी मुंबई व नाट्यगृहाची स्तुती केली आहे. मुक्ता बर्वे यांच्यासोबत ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हत्तंगडी यांनीदेखील कौतुक केले आहे. मुक्ता बर्वे यांनी नवी मुंबई महापालिकेच्या वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात रविवारी 'चारचौघी' या नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी नाट्यगृहातील स्वच्छता, रंगभूषा कक्ष, वातानुकूलित यंत्रणा ते अगदी डासविरहित पिटापर्यंत विविध सुविधांचा आढावा घेत 'अप्रतिम नाट्यगृह' अशा शब्दात कौतुक केले. त्यांना हे स्वतःहून करावेसे वाटले यातच त्यांच्या मनाचा मोठेपणा, सजगता आणि गुणग्राहकता दिसून येते असे पालिकेने म्हटले आहे. मुक्ता बर्वे यांच्यासह ज्येष्ठ नामांकित अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, पर्ण पेठे, कादंबरी कदम, श्रेयस राजे तसेच सहकारी तंत्रज्ञ कलावंत यांचे पालिकेतर्फे आभार मानण्यात आले. पुढील काळातही येथील व्यवस्थेची गुणवत्ता अधिक उत्तम राखण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन पालिकेने दिले आहे.

# पाणजे पाणथळ क्षेत्राचे जतन करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

पाणजे पाणथळ क्षेत्राला क्राँक्रीटच्या जंगलांमध्ये रुपांतरीत करुन समृध्द जैवविविधतेला नष्ट करण्यापासून वाचवण्याच्या दृष्टीने पर्यावरणवाद्यांनी आपले अभियान सुरू केले आहे. आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनाच्या निमित्त्याने नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि सागरशक्ती एनजीओने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सोमवारी ईमेल पाठवून त्यात पर्यावरणाला जतन करण्यासंदर्भात मागणी केली.



सिडकोने नवी मुंबई सेझला चुकीच्या प्रकारे २८९ हेक्टर लांबीचा पाणथळ प्रदेश भाडेतत्वाने दिला आहे. नवी मुंबई सेझला जागा रिकामी करण्याचे निर्देश द्यावे, अशी नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी मुख्यमंत्र्यांकडे विनंती केली आहे. अगदी एका मोठ्या कार्पोरेट हाउसने नियोजन केलेला आयटी हब पाणजे जैवविविधतेच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरता कामा नये. बीएनएचएसच्या अहवालानुसार हे पाणथळ क्षेत्र अनेक पक्षांना आकर्षित करणारे स्थळ आहे.

पाणजे जैवविविधता उद्यान निर्मितीसाठी आदर्श स्थळ आहे. शासनाने सिडकोला आंतरभरती प्रवाहामध्ये कोणताही अडथळा न आणण्याची सक्त ताकीद द्यावी, असे सागरशक्तीच्या नंदकुमार पवारांनी सांगितले. पवारांनी हे निदर्शनास आणून दिले की स्थानिक लोक वास्तवामध्ये मैदानाची मागणी करत आहेत. ते कमी भरतीच्या वेळी शुष्क झालेल्या लहानश्या भागाचा खेळण्यासाठी उपयोग करतात. या लहानशा भूभागाला मुख्य पाणथळ क्षेत्रापासून एका बांधाद्वारे वेगळे करुन त्याचा मैदानासाठी उपयोग करता येऊ शकतो, मात्र त्यामुळे स्थलांतरीत पक्षांना कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये, असे ते म्हणाले.

दरवर्षी २२ मेला साजरा केल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनाची थीम ही आहे: करारापासून कृती पर्यंत: जैवविविधता पुन्हा निर्माण करा. गेल्या पाच वर्षांपासून नवी मुंबई सेझ सुरक्षेद्वारे प्रोत्साहन मिळालेल्या काही दुराग्रहींमुळे भरतीच्या पाण्यावर अडथळा घातल्यामुळे पांजे क्षेत्राचे नुकसान होत आहे. याच्या परिणामास्तव आधी अंदाजे २.५ लाखांच्या घरात असलेली स्थलांतरीत पक्ष्यांची संख्या आता झपाट्याने घटली आहे. पाणजे येथील जैवविविधता आता पुन्हा निर्माण करणे आणि नवी मुंबई सेझ शहरीकरणावर आळा आणणे आवश्यक आहे, असे पवार म्हणाले.

कुमार यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली की, विमानतळ प्रकल्पाच्या पर्यावरण प्रभाव परिक्षणामध्ये असे नमुद करण्यात आले की, पांजेसह इतर पाणथळ क्षेत्रांना बीएनएचएसने सूचवल्याप्रमाणे स्थलांतरीत पक्ष्यांसाठीचे स्थळ म्हणून जतन केले गेले पाहिजे. जरी बीएनएचएसने तसे सिडकोला आदेश दिले असले तरी, दुर्दैवाने सिडको पाणथळ क्षेत्राच्या अस्तित्वालाच नकार देत आहे, असे नॅटकनेक्टने सांगितले.

# दिघ्यात यंदाही पाणी साचण्याची शक्यता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या दिघा विभागातील बिंदुमाधव नगर या परिसरात पाणी साचण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रस्तावित दिघा रेल्वेस्थानकासाठी या परिसरात रेल्वेकडून पाण्याचा निचरा करण्यासाठी वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, पण नैसर्गिक नाला तसेच या परिसरात टाकलेल्या वाहिन्यांचा ताळमेळ नसल्यामुळे यंदाही पाणी साचणार असल्याने रहिवासी संतप्त आहेत.

इलठण पाडा येथील डोंगरापासून संजय गांधी नगर या परिसरातून जाणाऱ्या नाल्यामध्ये पाणी तुंबल्यास परिसरातील घरांमध्ये पावसाळ्यात पाणी साचण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे या परिसरातील नाल्याची सफाई करण्याची मागणी होत आहे. अशातच पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिघा विभागाचा पाहणी दौरा करून अभियंता तसेच विभाग अधिकाऱ्यांना नालेसफाई पूर्ण करण्याचे सूचित केले होते, मात्र असे असताना या परिसरातील नैसर्गिक नाल्यांची सफाई झाली नसल्यामुळे पाणी साचण्याची शक्यता आहे.

महत्त्वाचे म्हणजे अवकाळी पावसात या परिसरात पाणी साचण्याचा प्रकार घडला होता. त्यामुळे नालेसफाई पूर्ण करण्याची मागणी माजी स्थायी समिती सभापती नवीन गवते यांनी पालिकेकडे केली आहे.

### बांधकामांमुळे नाला अरुंद

**दिघा येथील ग्रीन वर्ल्ड इमारतीपासून जाणारा नाला अरुंद झाल्यामुळे येथे पाणी साचण्याची शक्यता आहे. तसेच मुकुंद कंपनीच्या प्रवेशद्वारावर दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचते. अशातच ठाणे-बेलापूर मार्गावरील दिघा रेल्वे स्थानकाच्या कामामुळे पाणी साचण्याची शक्यता आहे.**

# टेंभोडे गावानजीक आढळली हॅण्डग्रेनेडसदृश्य वस्तू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील टेंभोडे परिसरात असलेल्या झाडाझुडपात हॅण्डग्रेनेड सदृश्य वस्तू मिळल्याने परिसरात खळबळ उडाली होती.

पनवेल जवळील टेंभोडे परिसरात असलेल्या क्रिकेट मैदानाच्या शेजारील नाल्यालगत असलेल्या झाडीझुडपात हॅण्डग्रेनेड सदृश्य वस्तू

### परिसरात खळबळ

मिळल्याने परिसरात खळबळ उडाली होती. काही जागरूक नागरिकांनी या घटनेची माहिती खांदेश्वर पोलिसांना देताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत परिसराची तपासणी केली. घटनेचे गांभीर्य ओळखून खांदेश्वर पोलिसांनी नवी मुंबई बॉम्ब शोध व निकामी पथकाला पाचारण केले. पथकाने बॉम्ब निकामी करणारा पेहराव परिधान करून यंत्र व श्वानपथकाच्या सहाय्याने हॅण्डग्रेनेड सदृश वस्तूची तपासणी केली.

या तपासणीत पथकाला सदर हॅण्डग्रेनेड सदृश्य वस्तूत कोणतेही स्फोटक पदार्थ आढळून आले नाही. तसेच ती रिकामी असल्याचे आढळून आले. या वस्तू पथकाने ताब्यात घेतले असून ते कोणी व कशासाठी आणले याचा तपास करण्याचे आवाहन पोलिसांसमोर आहे. दरम्यान, घटनास्थळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन स्थितीचा आढावा घेतला. याबाबत माहिती पसरताच परिसरात खळबळ उडाली होती.

# विद्युत खांबावरील केबल हटवण्याचे काम वेगात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील दिवाबत्ती खांबांवरून विनापरवानगी विविध प्रकारच्या केबल्स टाकल्याचे शहरभर पाहायला मिळत होते. विविध एजन्सीकडून केबल टाकताना वायर खेचण्याच्या प्रकारामुळे दिवाबत्ती खांब पडण्याचे तसेच खांबावरील ब्रॅकेट व फिटिंगची दिशा बदलण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आल्याने व वारंवार याबाबत तक्रारी येत असल्याने तसेच शहरात पालिकेचे विद्युत खांबही पडल्याने अनेक अपघातही झाल्याच्या घटना घडल्या घडल्याने पालिकेने अशा केबल्स हटवण्याची कारवाई सुरू केली असून ही कारवाई सुरू असल्याची माहिती पालिका विद्युत विभागाने दिली आहे.

नवी मुंबई स्वच्छ शहर अभियानामुळे शहर स्वच्छ पण विद्युत खांबावर मात्र वायरीचे वेटोळे यामुळे शहर सौंदर्यीकरणालाही बाधा येत असल्याने अनेकदा दुर्घटनाही घडल्या आहेत त्यामुळे पालिकेने संबंधित एजन्सीला या केबल्स १५ दिवसांत हटवण्याचे आवाहन केले होते, परंतू मागील आठवड्यात मुदत संपल्याने पालिकेने कारवाईला सुरुवात केली आहे. नवी मुंबई महापालिका विद्युत विभागाच्या वतीने महापालिका क्षेत्रातील सर्व केबल ऑपरेटर तसेच इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर यांना पालिका विद्युत खांबावरील केबल काढून टाकण्याच्या सूचना करण्यात आलेल्या होत्या. याबाबतची अंमलबजावणी संबधित केबल ऑपरेटर तसेच इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर यांनी न केल्याने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सदर केबल्स हटविण्यास सुरवात करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल संबधित केबल ऑपरेटर, इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर जबाबदार असतील, असे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आलेले होते. त्यामुळे कारवाई करत आहे.



### मुदत संपल्याने कारवाईला सुरुवात

**नवी मुंबई शहरातील पालिकेच्या पथदिव्यांसाठीच्या पथखांबावर विविध कंपन्यांच्या केबल टाकलेल्या असतात त्यामुळे अनेक वेळा या केबलची दुरुस्ती तसेच नवीन केबल टाकताना विविध कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकडून विद्युत खांब कोसळण्याबरोबरच दुर्घटना घडतात त्यामुळे या केबल काढून टाकण्याचे आवाहन महापालिकेने केले होते. १५ दिवसांची मुदत संपल्यामुळे कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे, असे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील लाड यांनी सांगितले.**

# शिरवणे गाव, नेरूळ येथील नाले-गटार साफसफाई करावी

## भाजपच्या माधुरी सुतार यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळापूर्वी शिरवणे गाव, नेरूळ सेक्टर एक परिसरातील सर्व नालेसफाई व गटार साफसफाई करावी त्या पार्श्वभूमीवर या परिसराचा पाहणी दौरा पावसाळ्यापूर्वी करावा याबाबत सहाय्यक उपायुक्त तथा नेरूळ ब वॉर्ड अधिकारी प्रबोधन मवाडे अशी विनंती भाजपच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी एका लेखी निवेदनाद्वारे प्रत्यक्ष भेटून केली. हा दौरा पुढील आठवड्यात करणार असल्याचे मेवाडे यांनी बोलताना.

शिरवणे गाव अंतर्गत मोठ्या प्रमाणावर छोटे नाले गटारे आहेत त्यांची कुवत आता लोकसंख्येनुसार अपुरी पडत चाललेले आहे त्यामुळे दर दोन दिवसाने ते नाले व गटारे तुडुंब भरले जातात. त्यामुळे त्यांची साफसफाई नियमित करणे अत्यावश्यक आहे तरी आपण या गोष्टींची दखल घेत नियमित कचरा साफसफाई तसेच मोठी गटारे नाले साफसफाई व मलनिस्सारण वाहिन्या तातडीने साफसफाई करून घ्यावी, अशी विनंती सुतार यांनी केली आहे.

शिरवणे गाव अंतर्गत पाणी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे त्यामुळे बऱ्याच ठिकाणी खोदकाम केलेले आहे. त्यांची पावसाळापूर्वी डागडुजी आवश्यक आहे. उघड्या गटारांवरील झाकणे ही त्वरित टाकून घेणे आवश्यक आहे. जेणेकरून काही दुर्घटना होणार नाही.



अनेकदा पावसाळ्यामध्ये या परिसरामध्ये रस्त्यावरील मल:निस्सारण वाहिन्या, गटारे यांची झाकणे बाजूला पडतात अथवा त्या झाकणातून पाणी बाहेर पडत असते. पावसाच्या पाण्यात हेही पाणी वाहत असल्याने परिसरातील रहिवाशांना, पादचाऱ्यांना तसेच ये-जा करणाऱ्या वाहन चालकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. अनेकदा त्या वाहिन्यातून मलही रस्त्यावर विखुरलेला असतो .

नवी मुंबईसारख्या शहराला ही बाब भूषणावह नाही. पावसाळीपूर्व कामांमध्ये आपण गटारांची सफाई करतो. वृक्षछाटणी करतो. त्याच धर्तीवर पावसाळ्यापूर्वी वरील परिसरातील साफसफाईचे करावी. जिथे जिथे चोकअप असेल तो काढण्यात यावा. जेणेकरून पावसाळ्यात स्थानिक रहीवाशांना दुर्गंधीचा सामना करण्याची व आजारी पडण्याची वेळ येणार नाही. आपण संबंधितांना तसे निर्देश द्यावेत आणि या परिसराचा पाहणी दौरा करावा, अशी मागणी माधुरी सुतार यांनी नवनियुक्त सहाय्यक उपायुक्त यांना केली आहे.

शिरवणे गाव आणि गावठाणमधील मलनिस्सारण वाहिन्या मागील २० वर्षांपूर्वीच्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत त्या ठिकठिकाणी नादुरुस्त अवस्थेत असल्याचे पहावयास मिळते. बऱ्याच भागातील वाहिन्या गांजलेल्या आणि तुटलेल्या अवस्थेत असून त्यातुन दुर्गंधीयुक्त उग्र वास येत असतो. या वासामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. अगोदरच वातावरणाच्या बदलामुळे नागरिकांना विविध अजाराने ग्रासले असून पावसाळ्यात नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये. विशेषत लहान मुलांना वयोवृद्ध नागरिकांना आरोग्याच्या समस्याचा सामना करावा करावा लागु नये. याची खबरदारी म्हणुन आपन पाहणी दौरा करावा, असे माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी सांगितले.

**नेरूळ ब विभाग अंतर्गत असणाऱ्या विविध समस्या आणि नागरिकांचे प्रश्न अधिक सुलभ आणि गतीने सोडण्याचा प्रयत्न करणार आहे. शिरवणेगाव आणि नेरूळ सेक्टर १ मध्ये पाहणी दौरा आठवड्यात करणार आहे**

**–प्रबोधन मवाडे, सहाय्यक उपायुक्त तथा नेरूळ ब विभाग अधिकारी**

# खोपोलीत स्वच्छता कागदावरच!

## कचऱ्याने गटारे तुडुंब भरली; प्रशासनाचे दुर्लक्ष

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेकडून स्वच्छता सर्वेक्षण अभियाना अंतर्गत सर्वत्र भिंती रंगवून स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. भिंती रंगविण्यात लाखो रुपये खर्च होत असून, मात्र शहरातील स्वच्छता वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे. नगरपालिका क्षेत्रातील बहुसंख्य गटारे, नैसर्गिक नाले कचरा व गवताने तुडुंब भरली असून, सांडपाणी निचरा होत नसल्याने डास व मच्छरांनी नागरिक हैराण झाले आहेत. प्रशासनाला याकडे लक्ष देण्यास वेळ नसून, भिंती रंगवून स्वच्छता संदेश दिले म्हणजे स्वच्छता असे अनोखे सर्वेक्षण अभियान शहरात राबविण्यात येत आहे.



स्वच्छता अभियान अंतर्गत लाखो रुपये निधी खर्च होत आहे. मात्र स्वच्छता बाबत नागरिकांना हव्या त्या मूलभूत गरजा व सुविधा देण्याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. रहिवासी सोसायटया, बैठया वसाहती, सार्वजनिक गटारी व नैसर्गिक नाल्यांची स्थिती भयानक आहे. गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्यांनी गटारे आणि नाले भरले आहेत. अनेक गटारे तुटलेल्या असून, सांडपाणी रस्त्यावर येत आहे. मात्र दुसरीकडे स्वच्छता संदेश व भिंती रंगविण्यात पालिका प्रशासन व्यस्त आहे.

**टप्पाटप्याने सर्व परिसरात पावसाळी पूर्व गटारी व नाले सफाईची कामे होत आहेत. यासाठी विशेष पथक बनविण्यात आले असून, दोन वरिष्ठ अधिकारी याकामी नेमण्यात आले आहेत.**
**–अनुप दुरे पाटील, मुख्याधिकारी खोपोली**

**महिनोंमहिने गटारे साफ केल्या जात नाहीत. वीज वितरण कडून तोडण्यात आलेली झाडांच्या फांद्या महिना झाला तरी तशाच गटारांमध्ये पडून आहेत.**
**सुहास सेलूकर, रहिवासी खोपोली**

# शासनाच्या विविध योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा -तहसीलदार आयुब तांबोळी

**खोपोली : प्रतिनिधी**

शासनाने नागरिकांसाठी ज्या ज्या योजना कार्यान्वित केल्या आहेत, त्या योजनांचा लाभार्थीनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, कागदपत्राबाबत काही अडचणी आल्यास आमच्या महसूल कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.

खोपोलीचे प्रथम नगराध्यक्ष गो. पू. तन्ना यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त तना परिवार व मित्रपरिवार तसेच लोहाना समाज यांच्या वतीने शासन आपल्या दारी या शिबिराचे तसेच रक्तदान शिबिराचे मंगळवारी आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार तांबोळी यांनीन केले.



याप्रसंगी व्यासपीठावर नायब तहसीलदार सुधाकर राठोड, नायब तहसीलदार विजय पुजारी, महसूल अधिकारी खोत सचिन वाघ, तलाठी दीप्ती चोनकर, त्याचप्रमाणे बाबुभाई तना, रामबिलास जाकोटिया, डॉक्टर सतीश जाकोटीया आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, श्रावण बाळ राज्यनिवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसाह्य योजना, अंतर्गत दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यावेली काही दाखले प्रतिनिधीक स्वरूपात तहसीलदार तांबोळी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले

दरम्यान रक्तदान शिबिरात १८ रक्तदात्यांनी रक्तदान केले, या शिबिरात खोपोली शहरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# जेएसडब्ल्यू सीएसआर विभागातर्फे जागतिक जैवविविधता दिन साजरा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जे.एस.डब्ल्यू एस्पायर प्रोजेक्ट अंतर्गत मॅजिक बस या संस्थेने को.ए.सो.ना.क. गायकर माध्यमिक शाळा वळके या शाळेतील मुलांसाठी जागतिक जैवविविधता दिवस आयोजित केला होता. जे.एस. डब्ल्यू सीएसआर विभाग साळाव समुदाय संघटक राकेश चवरकर, प्रतिभा ठाकूर कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. यावेळी अकॅडमीक एज्युकेटर शितल गायकर यांनी जैवविविधता या विषयावर मार्गदर्शन केले.

त्यानंतर मुलांनी उन्हाळी कार्यशाळेत बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी सर्व सदस्य आणि पालकांनी या प्रोजेक्टमुळे मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळत असून अश्या प्रकारचे कार्यक्रम आयोजन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीतल गायकर व आभार प्रदर्शन वर्षा ठाकूर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकल्प विभाग समन्वयक डॉ. प्रगती पाटील, शीतल गायकर, वर्षा ठाकूर, धनश्री पेणकर, प्राची खोत, वर्षा भोय, मीनल रोटकर यांनी विशेष मेहनत घेतली.



## रोहा ब्राह्मण मंडळातर्फे रणजित सावरकर यांचे शनिवारी व्याख्यान

**रोहे : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यानिमित्ताने शनिवार दिनांक २७ मे रोजी रात्रौ ९:३० वा. भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या भट सभागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू रणजितराव सावरकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदुत्वाची १०० वर्षे या विषयावर ते विचार व्यक्त करणार आहेत.

नागरिकांनी सावरकरांचे विचार ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ब्राह्मण मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले यांनी केले आहे.

# माथेरान शटल सेवेच्या फेऱ्यांत वाढ

**माथेरान: रामप्रहर वृत्त**

ऐन सुट्टयांच्या हंगामात शटल सेवेच्या कमी फेऱ्यांमुळे पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते. बहुतांश पर्यटक हे खासकरून मिनिट्रेन मधून प्रवास करण्यासाठी दुरदुरुन येत असतात. परंतु बोग्याची संख्या सुध्दा कमी असून अमन लॉज ते माथेरान दरम्यान ठराविक फेऱ्या असल्यामुळे पर्यटकांना तिकिटे उपलब्ध होत नाहीत याचा एकंदरीतच इथल्या पर्यटनावर परिणाम झालेला दिसून येत आहे.

याकामी शिवसेनेच्या शिंदे गटाच्या शिष्टमंडळाने दि.१७ मे रोजी मावळ मतदार संघातील खासदार श्रीरंग बारणे यांची पनवेल येथील कार्यालयात भेट घेऊन निवेदन सादर केले होते. त्यावेळी बारणे यांनी मध्य रेल्वेच्या संबंधीत अधिकारी यांच्याशी मोबाईल द्वारे संपर्क साधून यावर लवकरच ठोस उपाययोजना करण्यात यावी असे सूचित केल्याप्रमाणे या मार्गावर शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करण्यात आली आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, दिलीप कदम, पराग सुर्वे, माथेरान धनगर समाज माजी अध्यक्ष राकेश कोकळे आदी उपस्थित होते.



नेरळ माथेरान दरम्यानच्या घाटरस्त्यात सुट्टयांच्या हंगामात वाहनांची कोंडी होते. त्यामुळे अनेकदा पर्यटक माघारी जातात, याकामी गाड्यांची संख्या वाढवावी त्याचप्रमाणे पावसाळ्यात चार महिने नेरळ ते माथेरान ही सेवा बंद असते, त्यामुळे दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर या गाड्यांची संख्या वाढल्यास पर्यटकांना प्रवास करणे सुखकर होऊ शकते. असेही शिष्टमंडळाने बारणे यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर आपण रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करून लवकरच मार्ग काढला जाईल असे आश्वासन खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले.

**असे आहे वेळापत्रक**

माथेरान स्टेशन ते अमन लॉज
सकाळी– ८:२०,९:१०, १०:०५,११:३५.
दुपारी– १:१०, २:००,३:१५,
संध्या.– ४:३०,५:२०

अमन लॉज ते माथेरान स्टेशन
८:४५,९:३५,१०:३०,
दुपारी– १२:००,१:३५, २:२५, ३:४०
संध्याकाळी– ४:५५, ५:४५

# खालापुरात मुख्य मॅनेजरनेच कंपनीला ठगविले

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील नारंगी औद्योगिक क्षेत्रात असलेल्या एच.पी.ग्रुपमध्ये काम करणाऱ्या वर्क्स मॅनेजर निळू दळवी याने कारखाना मालकाचा विश्वास संपादन केला होता. त्यामुळे मालकाने आर्थिक व अन्य अधिकार निळू दळवी यांना बहाल केले होते. याचाच फायदा घेत लाखो रुपयांची अपरातफर केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने दळवी यांच्या विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपास करून दळवी यास अटक केली असून, आणखी काही मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



निलू दळवी हा सदर कारखानयात २०१४ पासून कामावर असून, त्यांच्यावर मालकाने वर्क मॅनेजरची जबाबदार दिली होती. ही जबाबदारी सांभाळत असताना अधिक पैसा कमविण्याच्या उद्देशाने कारखान्यातील साहित्य चोरी करणे, ठेकेदारांकडून तसेच विक्रेत्यांकडून टक्केवारी घेणे, कारखान्याच्या माध्यमातून उत्पादन करून स्व:ताचा दुसरा उद्योगधंदा चालवणे, कारखान्यातील कामगार आपल्या उद्योगधंद्यात राबवून घेऊन लाखोचा नफा मिळविणे असा धंदा सुरू केला. निलू दळवीच्या याचा गोरख धंद्याचा भांडा फुटला असून पोलिसांनी त्याला मंगळवारी(दि.२३) अटक केली आहे.

दरम्यान निलू दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या प्लांटची पाहणी सदर कंपनीच्या मालकाने केली असता बहुतांश साहित्य आपल्या कंपनीतील साहित्य आढळून आले आहे.

# एव्हरेस्टवीर संतोष दगडे यांचे कर्जतकरांकडून जोरदार स्वागत

**कर्जत : प्रतिनिधी**

जगातील सर्वात उंच शिखर असलेले माऊंट एव्हरेस्ट सर करण्याचे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असते. माऊंट एव्हरेस्ट सर करायला निघालेल्या कर्जत येथील गिर्यारोहक संतोष दगडे यांनी एव्हरेस्टवर पाऊल ठेवत इतिहास घडवला असून ठरलेल्या एक दिवस आधीच एव्हरेस्ट सर केला. ते सोमवारी रात्री कर्जतला आले. त्यांचे कर्जतकरांनी जोरदार स्वागत करून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

१ एप्रिलपासून जगातील २०० गिर्यारोहकांचीची तुकडी जगातील सर्वात उंच शिखर असलेल्या माऊंट एव्हरेस्टच्या चढाईवर निघाले होते. त्यात भारत देशातील १५ गिर्यारोहक असून, या सर्व गिर्यारोहक यांच्यातील पहिली सात जणांची तुकडी बुधवारी १७ मे रोजी सर माऊंट एव्हरेस्टवर पोहोचली आहे.

दरम्यान, त्याआधी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या माऊंट एव्हरेस्ट वीरांना शुभेच्छा दिल्या होत्या. रायगड कर्जत येथील संतोष दगडे, ठाणे, डोंबिवली आणि बदलापूर येथील संदीप मोकाशी, हेमंत जाधव आणि धनाजी जाधव या चौघांनी एकाच वेळी प्रयाण केले होते. काही दिवस हिमालयातील हवामानात झालेले बदल यामुळे माऊंट एव्हरेस्ट सर करण्यासाठी निघालेल्या गिर्यारोहकांची कोणतीही तुकडी बेस कॅम्प चार ते माऊंट एव्हरेस्ट या टप्प्यासाठी निघाली नव्हती. १६ मे रोजी वातावरणात झालेला बदल पाहून रात्री बेस कॅम्प चार येथून सात गिर्यारोहकांची तुकडी माऊंट एव्हरेस्टकडे निघाली आणि या तुकडीने सकाळच्या पहिल्या प्रहरी माऊंट एव्हरेस्ट सर केला. त्या पहिल्या तुकडीमध्ये जगातील सहा देशांचे सात एव्हरेस्ट वीर सहभागी होते. त्यात भारतातून निशा कुमारी आणि संतोष दगडे यांचा समावेश होता रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील गिर्यारोहक संतोष दगडे यांना शेरपा मिंगमा कर्मा यांची या मोहिमेत साथ मिळाली. आपल्यासोबत छत्रपती शिवाजी महाराजांच फोटो छापलेला झेंडा आणि वरच्या भागात भारताचा तिरंगा असा झेंडा एकत्र असलेले साहित्य सोबत नेले होते. तो झेंडा मानाने माऊंट एव्हरेस्ट शिखरावर रोवत झेंड्याला अभिवादन केले.

सोमवारी दुपारच्या सुमारास मुंबई विमानतळावर संतोष दगडे यांचे आगमन झाले. त्यानंतर रात्री नऊच्या सुमारास दगडे कर्जतचे प्रवेशद्वार असलेल्या चारफाटा येथे आले. त्या वेळी कर्जतकरांनी फटाक्यांची आतषबाजी केली. या वेळी माजी नगरसेवक गुरुनाथ पालकर, शिवशंभो युवा हायकर्सचे विकास चित्ते, शैलेश सातपुते, महेंद्र कर्वे, दिलीप कदम, प्रदीप गोगटे, प्रशांत दांडेकर, अनिल होजगे, संतोष थोरवे, सुधांशू वनगे, अविनाश उपाध्ये, संतोष मालगुंडकर, दिलीप बडेकर, अभिजीत रेणोसे आदी उपस्थित होते.



**सर्वांनी केले कौतुक**

माऊंट एव्हरेस्ट मोहिमेवर कर्जत येथून गेलेले गिर्यारोहक संतोष दगडे यांनी सोबत हिंदुस्थानचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो छापलेला झेंडा आणि त्याच्या वरच्या भागात भारताचा तिरंगा झेंडा एकत्र असलेले साहित्य सोबत नेले होते. तो झेंडा मानाने शिखरावर रोवत त्यांनी अभिवादन केले. याचेही या वेळी कौतुक झाले.

## दिघी येथे आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेडच्या वतीने दिघी येथे आरोग्य उपकेंद्रात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी मुंबईतील नामांकित आर. एन. कूपर हॉस्पिटल विले पार्ले च्या तज्ञ डॉक्टरांनी मोफत आरोग्य सेवा प्रदान केली.

या शिबिरात मोफत मधुमेह तपासणी व उच्चं रक्तदाब तपासणी करण्यात आली. याशिबीरामध्ये अनेक नागरीक त्वचाविकार व गुडघे दुखी ने त्रस्त असल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, आरोग्य तपासणी शिबीरामध्ये आलेल्या सर्व रुग्णांना मोफत औषध पुरवठा अदानी फाऊंडेशन मार्फत करण्यात आला. या शिबीरास दिघी सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी ढेबे व सर्व टीम यांनी भेट दिली.

यावेळी अदानी फाऊंडेशनच्या जयश्री काळे, दिघी पोर्टचे अरविंद सिंग बेदी, विवेक गुप्ता व अरुल जीवा उपस्थित होते. शिबिरासाठी माणगाव येथील नितीन चांदोरकर व त्यांचे सहकारी, अदानी फाऊंडेशन चे अवधूत पाटील यांचे सहकार्य मिळाले.

## भेरवच्या सुपुत्राची पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड

**पाली : प्रतिनिधी**

पोलीस भरतीच्या नुकत्याच पार पडलेल्या २०२२-२३च्या प्रक्रियेत भेरव गावचा सुपुत्र सुजित अरुण पवार याची मुंबई पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली आहे. सुजित ने पहिल्याच फेरीत यश मिळवले. या यशाबद्दल सुजित चे सर्व स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

जिद्द व चिकाटीच्या जोरावर सुजित ने हे घवघवीत यश संपादन केले आहे. पूर्वीपासूनच सुजित ला पोलीस होण्याची आवड होती.सुजित चा भाऊ सुमित हा देखील नवी मुंबई पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल आहे. याबरोबरच तो खोपोली येथे पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी चालवतो. सुजित च्या या यशामागे त्याचे आई वडील,भाऊ,पवार परिवार व मित्रमंडळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सुजित चे भेरव ग्रामस्थांच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.यावेळी दिपक पवार,गौतम पवार,चिंतामण पवार,विशाल पवार,आकाश पवार,अमोल पवार,महेश सागळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



# रायवळ आंब्यांना ग्राहकांची पसंती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांव म्हणजे रानमेव्याचे माहेरघर हापूस आंबे,जाबुळ, करवंदे अशी अनेक फळं माणगावातल्या जंगलात मुबलक मिळतात. यावर्षी मात्र हापूस आंब्या बरोबरच रायवळ आंबे अतिशय कमी प्रमानात मोहरल्याने सामान्य रायवळ आंबे बाजारपेठेत आणि जंगलांमध्येही अभावानेच दिसत आहेत. गेल्या काही दिवसांपासून बाजारात रायवळ आंब्यांची आवक वाढली असून ६० ते १०० रुपयांनी विक्री होत आहेत.

सामान्यतः एप्रिल महियान्यात तयार होणारे रायवळ आंबे चवीसाठी आंबट गोड आणि चवदार लागतात. सामान्य माणगांव करांच्या जेवणाची लज्ञत वाढविणारे हे आंबे बाजारातून गायब असल्याने खवय्यांमध्ये काहीशी नाराजी आहे. स्वस्त आणि मस्त असणारे रायवळ आंबे सामान्य जणांच्या खिशाला परवडणारे व लज्ञत वाढविणारे असतात.दरवर्षी



या हंगामात सुरुवातीला आंब्याना चांगला मोहोर आला होता मात्र डिसेंबर महिन्यात पडलेल्या धुरक्यामुळे सगळा मोहोर गळून गेला. रानात लागणाऱ्या वणाव्यामुळेही मोहोराचे नुकसान झाले.त्यामुळे रानात अगदी तुरळक आंबा दिसत आहे. आंब्यांच्या आकारानुसार व गोडव्यानुसार त्यांना भाव मिळत असून एकदम लहान आकाराचे आंबे ६० रूपये तर आकाराने मोठे व गोडवा असणारे आंबे १०० रूपये डझन विक्री होत आहेत.

मे महिन्याच्या अखेरीस रायवळ आंबे पूर्ण तयार झाले असल्याने गेल्या काही दिवसांपासून बाजारात विक्रेते आंबे विक्रीसाठी येत आहेत. आदिवासी महिलांनाही रायवळ आंबे विक्रीतून रोजगार मिळत असून पुढील काही दिवस रायवळ आंब्यांची विक्री सुरू राहील असे विक्रेत्यांनी सांगितले.

**या वर्षी रायवळ आंबे कमी प्रमाणात लागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून हे आंबे आडी करून झाल्यावर विक्रीसाठी आणले आहेत. लहान आंबे ६० तर मोठ्या आंब्यांना १०० रुपये डझन भाव मिळत आहे.**
**– सुगंधा पवार, विक्रेता**

## टीम इंडियाचे मिशन डब्ल्यूटीसी फायनल

# पहिली तुकडी इंग्लंडला रवाना


(संग्रहित छायाचित्र)

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी)च्या फायनलसाठी टीम इंडियाचा पहिला ग्रुप इंग्लंडला रवाना झाला आहे. यामध्ये जवळपास २० सदस्यांचा समावेश आहे. २०२१मध्ये उपविजेते ठरलेल्या भारताचे १० वर्षांतील पहिली आयसीसी ट्रॉफी जिंकण्याचे लक्ष्य असेल.

डब्ल्यूटीसी फायनल ७ ते ११ जूनदरम्यान ओव्हल येथे खेळवली जाईल. या महत्त्वपूर्ण सामन्यासाठी संपूर्ण संघ आयपीएल फायनलनंतर ३० मेपर्यंत पोहचणार आहे. ज्या खेळाडूंचा संघ आयपीएल प्ले ऑफच्या आधी बाहेर झाला, ते खेळाडू पहिल्या ग्रुपमध्ये आहेत. टीम इंडियाचे प्रशिक्षक राहूल द्रविडसह सपोर्ट स्टाफचे अन्य सदस्यही रवाना झाले आहेत. कर्णधार रोहित शर्मा, रवींद्र जडेजा, इशान किशन, शुभमन गिल, मोहम्मद शमी, के. एस. भारत आणि अजिंक्य रहाणे या सात खेळाडूंचे संघ प्लेऑफमध्ये असल्याने ते सध्या भारतात असतील.

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, ३० मेपर्यंत दररोज खेळाडू रवाना होतील. दिग्गज वेगवान गोलंदाज जयदेव उनादकट नॅशनल क्रिकेट अकॅडमीमध्ये त्याच्या दुखापतीवर मात करीत होता. या फायनलसाठी तो फिट होण्याची आशा आहे आणि २७ मेनंतर इंग्लडला जाऊ शकतो, तर तीन स्टँडबाय खेळाडूंमध्ये मुकेश कुमार पहिल्या ग्रुपचा भाग असणार आहे आणि दुसरे दोन खेळाडू ऋतुराज गायकवाड आणि सूर्यकुमार यादव त्यांच्या आयपीएल संघांचे सामने झाल्यानंतर रवाना होणार आहेत.

चेतेश्वर पुजारा आधीच इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेट खेळत आहे. भारतीय संघातील बहुतांश खेळाडू आयपीएलच्या दोन महिन्यांनंतर विजेतेपदाच्या लढतीत उतरत असताना केवळ तीन ऑस्ट्रेलियन खेळाडू सर्वांत श्रीमंत टी-२० लीगमध्ये खेळले आहेत.

गेल्या आठवड्यात माजी क्रिकेटपटू रिकी पॉन्टिंगने म्हटले होते की, ऑस्ट्रेलियन संघ अंतिम सामन्यासाठी मानसिकदृष्टचा अधिक चांगल्या प्रकारे तयार असेल, तर भारतीयांचा त्यांच्या मागे खेळण्यासाठी मौल्यवान वेळ असेल.



## ज्युनिअर्स पनवेल प्रीमियर लीगचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

टीआयपीएल, सोसायटी क्रिकेट क्लब आणि सुनील सरगर क्रिकेट अकॅडमीच्या वतीने तसेच भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटी मैदानात ज्युनिअर्स पनवेल प्रीमियर लीग २०२३ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



१६ वर्षाखालील मुलांसाठी आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा २३ मे ते २ जूनपर्यंत रंगणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक राजू गुप्ते यांच्या हस्ते झाले.

या वेळी सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव, उल्हास झुंजारराव, मृत्युंजय पाटील, निशांत सावंत, अमेय देशमुख, सुनील सरगर, रवी सोळंकी, दिनेश जैन, प्रवीण मोरबाळे यांच्यासह पदाधिकारी, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

## कुमार गट कबड्डी स्पर्धेत सिद्धीप्रभा फाउंडेशन विजेते

### रूपेश साळुंखे ठरला सर्वोत्तम खेळाडू



**मुंबई : प्रतिनिधी**

शिवास इंटरप्राईजेस् आयोजित कुमार गट कबड्डी स्पर्धेत प्रभादेवीच्या सिद्धीप्रभा फाउंडेशनने विजेतेपद पटकाविले. सिद्धीप्रभाचा रूपेश साळुंखे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.

मुंबई सेंट्रल, बीआयटी चाळ येथील महात्मा स्पोर्ट्सच्या पटांगणावर झालेल्या अंतिम सामन्यात सिद्धीप्रभाने विजय क्लबचा प्रतिकार ३७-२० असा मोडून काढत विजेतेपदाचा चषक उंचाविला. आक्रमक सुरुवात करीत पहिला लोण देत सिद्धीप्रभाने पूर्वार्धात १४-६ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात त्याच जोशाने खेळ करीत १७ गुणांच्या फरकाने विजयावर शिक्कामोर्तब केले.

रूपेश साळुंखेचा अष्टपैलू खेळ त्याला विशाल घाडगे व रविकांत यांची मिळालेली चढाई-पकडीची मोलाची साथ यामुळे हा विजय सोपा गेला. या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात सिद्धीप्रभाने गोलफादेवीचा ३५-२२ असा, तर विजय क्लबने शताब्दी स्पोर्ट्सचा ३१-२९ असा पराभव करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. विजय क्लबचा रोहन राज स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचा, तर सिद्धीप्रभाचा विशाल घाडगे उत्कृष्ट पकडीचा खेळाडू ठरला. दोन्ही खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

## नीरज चोप्रा नंबर वन भालाफेकपटू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड ॲथलेटिक्सनुसार जारी केलेल्या नवीन रँकिंगमध्ये ऑलिम्पिक गोल्ड मेडलिस्ट नीरज चोप्रा पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत जगातील नंबर वन खेळाडू बनला आहे. नीरजला पहिल्यांदाच हा किताब मिळाला असून त्याने पुन्हा एकदा देशाचे नाव उज्ज्वल केले आहे.

नीरजने टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी पहिल्यांदा ट्रॅक ॲण्ड फिल्ड इव्हेंटमध्ये सुवर्णपदक जिंकण्याची कमाल केली होती. ताज्या रँकिंगनुसार नीरज चोप्राला १४५५ गुण मिळाले आहेत, जे आताचा वर्ल्ड चॅम्पियन एंडरसन पीटर्सच्या २२ अंकांनी जास्त आहेत. एंडरसनच्या नावावर सध्याच्या घडीला १४२२ गुण आहेत.

## आरएमएमएस क्रिकेट स्पर्धेत 'सेव्हन हिल्स'ची विजयी सलामी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व आयडियल ग्रुपतर्फे आरएमएमएस सहकार्याने क्रीडापटू गोविंदराव मोहिते यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अमृत महोत्सवी आरएमएमएस चषक आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेत सेव्हन हिल्स हॉस्पिटल संघाने सलामीची साखळी लढत जिंकली. सलामीवीर अमोल तोरस्कर व सुशांत गुरव यांच्या दमदार अर्धशतकामुळे सेव्हन हिल्स हॉस्पिटलने बलाढ्य जे. जे. हॉस्पिटलचा ७३ धावांनी पराभव केला.

छत्रपती शिवाजी पार्क मैदानात प्रथम फलंदाजी करणाऱ्या सेव्हन हिल्स हॉस्पिटलची सलामी जोडी जे.जे. हॉस्पिटलचा प्रमुख मध्यमगती गोलंदाज विलास जाधवने चार धावसंख्येवर फोडली, परंतु त्यानंतर सलामीवीर अमोल तोरस्कर (३७ चेंडूंत ५३ धावा), सुशांत गुरव (३२ चेंडूंत ६१ धावा) व रोहित सोमार्डे (१८ चेंडूंत २३ धावा) यांनी आक्रमक फलंदाजी करून सेव्हन हिल्स हॉस्पिटलला २० षटकांत चार बाद १७८ धावांचा डोंगर उभारून दिला. विजयी लक्ष्याच्या दबावामुळे जे.जे. हॉस्पिटलची फलंदाजी बहरली नाही. डॉ. मनोज यादव (६ धवन २ बळी), सुशांत गुरव (९ धावांत २ बळी), रितेश लोहट (१४ धावांत २ बळी) यांनी प्रभावी गोलंदाजी करून जे.जे. हॉस्पिटलचा डाव मर्यादित २० षटकांत ९ बाद १०५ धावांवर थोपविला. परिणामी सेव्हन हिल्स हॉस्पिटलने ७३ धावांनी शानदार विजय संपादन केला.




जे.जे. हॉस्पिटलतर्फे सुभाष शिवगण (२२ चेंडूंत २४ धावा), सागर मारू (२३ चेंडूत १७ धावा), ओमकार शिवतरकर (१४ चेंडूंत १६ धावा) यांनी छान फलंदाजी केली.

अष्टपैलू सुशांत गुरव व सुभाष शिवगण यांना उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार देऊन श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे माजी अध्यक्ष व क्रिकेटपटू नरेंद्र राणे, क्रीडाप्रेमी सोहेल सुभेदार, सत्कारमूर्ती क्रिकेटपटू डॉ. हर्षद जाधव व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी गौरविले.

क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कारकिर्दीबद्दल क्रिकेटपटू नरेंद्र राणे यांचा रुग्णालयीन क्रिकेट संघांच्यावतीने आयडियल अकॅडमीतर्फे शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

## सचिनकडून गिलचे मजेशीर कौतुक



**मुंबई : प्रतिनिधी**

शुबमन गिलने शतक ठोकून गुजरात टायटन्सला विजय मिळवून दिला आणि मुंबई इंडिन्सला प्लेऑफचे तिकीट पक्के झालं. यानंतर महान फलंदाज सचिन तेंडुलकरने गिलचे अनोख्या पद्धतीने कौतुक केले. त्याने ट्विटमध्ये लिहिले, कॅमेरून ग्रीन आणि शुबमन गिल यांनी मुंबई इंडियन्ससाठी खूप फलंदाजी केली. येथे त्याने एक मजेदार इमोजीदेखील टाकला.

मुंबई इंडियन्स आयपीएल २०२३मधून बाहेर पडणार होताच, पण शुबमन गिलने बंगळुरूमध्ये अशी काही खेळी केली, ज्यामुळे मुंबईला नवसंजीवनी मिळाली आणि ते प्ले ऑफमध्ये पोहचले. २२ वर्षीय युवा सलामीवीराने गुजरात टायटन्ससाठी सलग दुसरे शतक झळकावले.

सचिनने पुढे लिहिले, विराट कोहलीने अप्रतिम फलंदाजी करताना सलग दुसरे शतक झळकावले. त्याची खेळी अप्रतिम होती. मुंबई इंडियन्स प्लेऑफमध्ये पोहचल्याचा आनंद आहे. एकाच दिवसात आयपीएलमध्ये तीन शतके झळकली. प्रथम कॅमेरून ग्रीनने हैदराबादविरुद्ध मुंबईसाठी शतक झळकावले आणि दुसरीकडे विराट कोहली आणि शुबमन गिल यांनी बंगळुरू आणि गुजरात सामन्यात शतके ठोकली.

## ज्युनिअर पनवेल प्रीमियर लीगमध्ये रॉकविले फायटर, मॉर्निंग पंटर्स विजयी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिडलक्लास सोसायटीच्या मैदानावर सुरू असलेल्या टीआयपीएल ज्युनिअर पनवेल प्रीमियर लीगच्या पहिल्या सामन्यात रॉकविले फायटर संघाने विजयी सलामी दिली, तर दुपारच्या सामन्यात मॉर्निंग पंटर्स संघाने विजय मिळविला.

सलामीचा सामना प्रतिक क्रिकेट अकॅडमी विरुद्ध रॉकविले फाइटर असा रंगला. प्रतिक अकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारत १७९ धावा केल्या होत्या. या संघाकडून पार्थ पवारने ८४ धावांची खेळी केली. आव्हानाचा पाठलाग करताना रॉकविले फायटरने शेवटच्या षटकात १८१ धावा फलकावर लावत सामना जिंकला. रॉकेविले फायटरकडून धीरेन गोवारी (७९) आणि ओमप्रकाश (४४) यांनी उत्तम खेळी केली.

दुपारच्या सत्रात मॉर्निंग पंटर्स विरुद्ध न्यू पनवेल वॉरियर यांच्यात सामना झाला. मॉर्निंग पंटर्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण निवडले. न्यू पनवेल वॉरियरने प्रथम फलंदाजी करताना १९६ धावा केल्या होत्या. त्यांच्याकडून अर्णव पाचकुडेने ५४ धावा केल्या. आव्हानाचा पाठलाग करताना मॉर्निंग पंटर्सच्या निलेश सावंतने नाबाद ९७ धावांची खेळी करून संघाला सामना जिंकवून दिला. तोच सामनावीर किताबाचा मानकरी ठरला.

## खेलो इंडिया कबड्डी स्पर्धेसाठी पंच प्रदीप मोकल यांची निवड



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील गडब येथील राष्ट्रीय कबड्डी पंच प्रदीप मोकल यांची खेलो इंडिया कबड्डी स्पर्धेसाठी पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. भारतीय खेळ प्राधिकरणच्या वतीने आयोजित खेलो इंडिया विद्यापिठ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगर येथे २३ ते २७ मेदरम्यान होत आहेत. या स्पर्धेसाठी मोकल यांची पंच म्हणून निवड झाली आहे.

रायगडचे सुपुत्र प्रदीप मोकल यांनी अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय कबड्डी स्पर्धांमध्ये पंच म्हणून काम पाहिले आहे, तर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांमध्ये निरीक्षक पंच प्रमुख म्हणून काम केले आहे, तर जपान व थायलंडचा कबड्डी संघ रायगडच्या दौऱ्यावर आलेला असताना झालेल्या ईडो जपान व ईडो थायलंड कबड्डी सिरिज स्पर्धेतही त्यांनी पंच म्हणून काम पाहिले आहे.

खेलो इंडिया कबड्डी स्पर्धेसाठी पंच म्हणून निवड झाल्याबद्दल रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, जिल्हा कबड्डी पंच मंडळाच्या सदस्यांनी प्रदीप मोकल यांचे अभिनंदन केले.

## संघाची खिल्ली उडवणाऱ्यांना विराटचे सडेतोड उत्तर



**मुंबई : प्रतिनिधी**

विराट कोहलीने नाबाद शतकी खेळी करून आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला ५ बाद १९७ धावांपर्यंत मजल मारून दिली, मात्र शुभमन गिलच्या बहारदार शतकामुळे गुजरातने बंगळुरूला सहा विकेट्सने पराभवाची धूळ चारली. या परावभाने बंगळुरूच्या प्ले-ऑफमध्ये दाखल होण्याच्या आशा संपुष्टात आल्या. त्यामुळे काहींनी बंगळुरूची खिल्ली उडवली. आगपाखड करणाऱ्या टीकाकारांना विराटने सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे.

१६ मोसमात एकदाही आयपीएल करंडक जिंकू न शकलेला संघ म्हणून काहींनी बंगळुरुची आणि पर्यायाने विराटची खिल्ली उडवली, पण आयपीएलच्या या मोसमात विराटने जुन्या लयीत परतत प्रतिस्पर्धी संघांची आणि गोलंदाजांची धुलाई केली. अनेकांनी विराटचे टी-२० ट्रेन्टी करिअर संपल्यात जमा केले होते, पण विराटने टायगर अभी जिंदा है हेच दाखवून दिले.

विराट म्हणाला, माझ्या खेळीवर मला समाधान आहे. बरेच लोक विचार करीत होते की, माझी टी-२० कारकीर्द संपली, उतरणीला लागली, पण मी सकारात्मक विचार करत होतो. चहूकडून टीका होत असताना निराशेच्या गर्तेत कधी गेलो नाही. टीकाकारांकडे मी फार लक्ष देत नाही.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com